दैनिक
# राज्य लोकतंत्र
www.epaper.rajyaloktantra.com | नवी दिशा... नवे विचार..... | email:rajyaloktantra75@gmail.com

बीड - महाराष्ट्र | वर्ष-५ | अंक-१७३ | रविवार, दि.१९ ऑक्टोबर २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने-६ | किंमत ३ रूपये

## थोडक्यात...

### दरीत पिकअप कोसळून ८ भाविक ठार

नंदुरबार : अस्तंबा शिखरावरून परतणाऱ्या भाविकांनी भरलेले वाहन घाटातून थेट १०० फूट खाली कोसळून ८ भाविक जागीच ठार झाले. तर १५ गंभीर जखमी झाले. ही घटना शनिवार (दि.१८) सकाळी १०.३० वाजता घडली. या अपघातातील मृत भाविक नंदुरबार तालुक्यातील आहेत. ऐन दिवाळीत काळाने घाला घातल्याने शोककळा पसरली आहे. महाभारतातील अश्वत्थामा यांचा रहिवास असलेले शिखर म्हणून धडगाव तालुक्यातील अस्तंबा शिखर प्रसिद्ध आहे. धडगाव तालुक्यातील असली येथे दरवर्षी दिपावलीत अस्तंबा (अश्वत्थामा) ऋषीची यात्रा भरत असते. गिर्यारोहणाचा तसेच अश्वत्थामापूजनाचा आनंद घेण्यासाठी लाखो भाविक या ठिकाणी भेट देतात. नंदुरबार तालुक्यातील काही भाविक अस्तंभा (अश्वत्थामा) ऋषिच्या दर्शनासाठी गेले होते. तेथून परत येत असताना चांदसैली घाटात या भाविकांची पिकअप गाडी थेट खोल दरीत कोसळून मोठा दुर्दैवी अपघात झाला. या अपघातात ८ जण जागीच ठार झाले.

### शिष्यवृत्ती परिक्षेतील बदल येत्या सत्रापासून

पुणेः पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा आणि पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेचा स्तर इयत्ता पाचवी ऐवजी इयत्ता चौथी आणि इयत्ता आठवी ऐवजी इयत्ता सातवी मध्ये करण्यास शासनाने मान्यता दिली आहे. शिष्यवृत्ती परीक्षेतील बदलाची अंमलबजावणी २०२५-२६ या शैक्षणिक सत्रापासून करण्यात येणार आहे. यामुळे २०२५-२६ या शैक्षणिक क्षेत्रात इयत्ता पाचवी आणि इयत्ता आठवी शिष्यवृत्ती परीक्षेचे आयोजन (अंतिमतः) साधारणतः फेब्रुवारी २०२६ च्या दुसऱ्या अथवा तिसऱ्या रविवारी करण्यात येईल. तर इयत्ता चौथी आणि इयत्ता सातवी शिष्यवृत्ती परीक्षेचे आयोजन साधारणतः एप्रिल किंवा मे २०२६ च्या कोणत्याही रविवारी करण्यात येईल. २०२६-२७ पासून पुढे इयत्ता चौथी इयत्ता सातवी मध्ये नियमितपणे शिष्यवृत्ती परीक्षेचे आयोजन करण्यात येईल.

### ड्रोन प्रशिक्षण केंद्र म्हणून 'वनामकृवि'ला मान्यता

परभणीः येथील वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाला नागरी विमान वाहतूक संचालनालयाकडून (डीजीसीए) अधिकृत रिमोट पायलट ट्रेनिंग ऑर्गनायझेशन-आरपीटीओ म्हणून (ड्रोन प्रशिक्षण केंद्र) मान्यता मिळाली आहे. यामुळे शेतकरी, विद्यार्थी, कृषी अभियंते व संशोधकांना ड्रोन चालविण्याचे प्रशिक्षण पूर्ण केल्यानंतर अधिकृत प्रमाणपत्र प्राप्त करण्याची सुविधा होणार आहे. कुलगुरू डॉ. इंद्रमणी मिश्रा यांच्या अध्यक्षेतील समितीने कृषी क्षेत्रासाठी ड्रोन वापराच्या मानक कार्यपद्धती (स्टँडर्ड ऑपरेशन प्रोसिजर) तयार केली आहे. पहिल्या टप्प्यात कीटकनाशक फवारणीसाठी ड्रोन संचालनाच्या मानक मार्गदर्शक तत्त्वांची निर्मिती करण्यात आली. या समितीचे अध्यक्ष डॉ. के. अलागुसुंदरम असून डॉ. इंद्रमणी संयोजक आहेत.

### बस्तरमध्ये २०८ नक्षलवाद्यांची शरणागती

जगदलपूरः बस्तर जिल्ह्यातील जगदलपूर येथे नक्षलवाद्यांनी एकाच दिवसात केलेले ऐतिहासिक सामूहिक आत्मसमर्पण झाले आहे. ११० महिलांसह तब्बल २०८ नक्षलवाद्यांनी रिझर्व्ह पोलिस लाईनमध्ये शस्त्रे खाली ठेवली. छत्तीसगडमधील बंदी घातलेल्या सीपीआय (माओवादी) संघटनेसाठी हा एक मोठा धक्का मानला जात आहे. आत्मसमर्पण केलेल्यांमध्ये वरिष्ठ नक्षली नेता रूपेश यांचाही समावेश आहे. त्यांनी एके ४७, इन्सास रायफलींसह आणि बॅरेल ग्रेनेड लाँचरसह १५३ शस्त्रे जमा केली. नक्षलवाद्यांना बसमधून समारंभाच्या ठिकाणी आणले गेले आणि पुनः मार्गेम नावाच्या औपचारिक समारंभात त्यांचे प्रतीकात्मक रेड कार्पेट स्वागत करण्यात आले. त्यांना राज्यघटनेची प्रत, गुलाब पुष्प देऊन मुख्य प्रवाहात सामील करून घेण्यात आले.

### धनत्रयोदशीच्या दिवशी चांदीत १३ हजारांची घसरण

नवी दिल्लीः धनत्रयोदशीच्या दिवशी सोने आणि चांदीच्या दरात घट झाली. सोने दहा ग्रॅममागे १,९१० रुपयांनी आणि चांदीच्या भावात एका किलो मागे तब्बल १३ हजार रुपयांनी घट झाली. सराफा बाजारात २४ कॅरेट सोन्याचा भाव १,९१० रुपयांनी घटून १ लाख ३० हजार ८६० रुपयांवर आला आहे. तर, २२ कॅरेट सोन्याचा भाव १,७५० रुपयांनी घटून १ लाख १९ हजार ९५० रुपयांवर आला आहे. चांदीचा भाव १ लाख ८५ वरून १ लाख ७२ हजार रुपयांवर घसरला. चांगल्या दराचा फायदा घेण्यासाठी सटोडियांनी विक्री केल्याने दरात काहीशी घसरण पाहायला मिळत आहे.

# अतिवृष्टीबाधित शेतकऱ्यांना दिलासा; ३ हजार २५८ कोटीच्या वाटपाचा शासनादेश निघाला

मुंबई । प्रतिनिधी

**सप्टेंबर महिन्यातील अतिवृष्टी आणि पुरामुळे नुकसान झालेल्या शेतीपिकांसाठी राज्य सरकारने ३ हजार २५८ कोटी रुपयांच्या वितरणाला मान्यता दिली आहे. याबाबतचा शासन निर्णय शनिवारी (दि.१८) रोजी प्रसिद्ध करण्यात आला आहे. यामध्ये २३ जिल्ह्यांचा समावेश असून बाधित पिकांसाठी २ हेक्टरच्या मर्यादेत मदत देण्यात येणार आहे.**




यामध्ये सर्वाधिक मदत अहिल्यानगर जिल्ह्यासाठी ८४६ कोटी ९६ लाख ८९ हजार रुपये करण्यात आली आहे. तर त्यापाठोपाठ सोलापूर जिल्ह्यासाठी ७७२ कोटी ३६ लाख ४५ हजार रुपयांची मदत देण्यात आली आहे. तर यवतमाळ जिल्ह्यासाठी २६२ कोटी ८ लाख ४५ हजार रुपयांच्या वितरणास मान्यता दिली आहे. तसेच अमरावती, सातारा, नंदुरबार, सिंधुदुर्ग जिल्ह्यांना देण्यात आली आहे. नागपूर विभागातील नागपूर, चंद्रपूर, वर्धा, भंडारा, गोंदिया, गडचिरोली जिल्ह्यांचा यामध्ये समावेश आहे. नागपूरसाठी ११ कोटी २३ लाख ७ हजार ▶▶ पान २ वर

### ३३ लाख ६५ हजार शेतकऱ्यांचा समावेश

राज्यातील २३ जिल्ह्यातील ३३ लाख ६५ हजार ५४४ शेतकऱ्यांना ३ हजार २५८ कोटी ५६ लाख ४७ हजार रुपयांच्या वितरणाला मंजुरी देण्यात आली आहे. यामध्ये २७ लाख ५९ हजार हेक्टरवरील शेतीपिकांसाठी मदत देण्यात आली आहे.

### दर आणि निकष जुनेच

राज्यात सप्टेंबर महिन्यात अतिवृष्टीने धुमाकूळ घातला. त्यामुळे ६८ लाख हेक्टर क्षेत्रावरील शेतीपिकांचं नुकसान झाले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना सरसकट अटी-शर्ती विना मदत देण्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली. तसेच एनडीआरएफच्या निकषांपेक्षा जास्तीची मदत देण्याची ग्वाही राज्य सरकारने दिली. परंतु शासन निर्णयात मात्र एनडीआरएफच्या मार्च २०२३ च्या निकष आणि दरानुसार जास्तीत जास्त २ हेक्टरच्या मर्यादेत मदत देय असेल असे स्पष्ट करण्यात आले आहे.

### १६ ऑक्टोबरच्या शासन निर्णयात मराठवाड्याचा समावेश

राज्य सरकारने १६ ऑक्टोबर रोजी एक शासन निर्णय प्रसिद्ध करून १ हजार ३५६ कोटी रुपयांच्या मदतीला मान्यता दिली आहे. त्यामध्ये बीड जिल्ह्यासाठी ५७७ कोटी ७८ लाख रुपये, धाराशिव जिल्ह्यासाठी २९२ कोटी ४९ लाख रुपये, लातूर जिल्ह्यासाठी २०२ कोटी ३८ लाख रुपये, परभणी जिल्ह्यासाठी २४५ कोटी ६४ लाख रुपये, नांदेड जिल्ह्यासाठी २८ कोटी ५२ लाख रुपये, सातारा जिल्ह्यासाठी ६ कोटी २९ लाख रुपये, कोल्हापूर जिल्ह्यासाठी ३ कोटी १८ लाख रुपये वितरणास मान्यता दिली आहे.

## संपुर्ण पाकिस्तान ब्राह्मोसच्या टप्प्यात-संरक्षण मंत्री राजनाथ सिंह

लखनौ । वृत्तसंस्था

**'ऑपरेशन सिंदूरने हे सिद्ध केले आहे की विजय आता आपल्यासाठी किरकोळ घटना राहिलेली नाही. विजय आपली सवय बनली आहे. देशाला खात्री आहे की आपले शत्रू आता ब्राह्मोसपासून सुटू शकणार नाहीत. पाकिस्तानी भूभागाचा प्रत्येक इंच आता आपल्या ब्राह्मोसच्या आवाक्यात आहे,'' अशा शब्दांमध्ये संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी शनिवारी (दि.१८) निर्वाणीचा इशारा दिला. उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्यासमवेत लखनौमधील ब्रह्मोस एरोस्पेस सुविधेत उत्पादित केलेल्या ब्रह्मोस क्षेपणास्त्रांच्या पहिल्या तुकडीला हिरवा झेंडा दाखवला. यावेळी ते बोलत होते.**



सशस्त्र दलांच्या अचूकता आणि तयारीबद्दल त्यांचे कौतुक करताना राजनाथ सिंह म्हणाले की, भारताचे शत्रू आता देशाच्या प्रगत क्षेपणास्त्र क्षमतांपासून दूर राहू शकत नाहीत. देशाला खात्री आहे की आपले शत्रू आता ब्राह्मोसपासून सुटू शकणार नाहीत. पाकिस्तानी भूभागाचा प्रत्येक इंच आता आपल्या ब्राह्मोसच्या आवाक्यात आहे. ऑपरेशन सिंदूरमध्ये जे घडले ते फक्त एक ट्रेलर होते; पण त्या ट्रेलरमुळे पाकिस्तानला हे जाणवले की जर भारत पाकिस्तानला जन्म देऊ शकला तर तो आणखी काय करू शकतो याबद्दल मला अधिक काही सांगण्याची गरज नाही, असेही ▶▶ पान २ वर

# अजित दादाच्या राष्ट्रवादीत दुफळी

## जिल्हाध्यक्ष डबल ढोलकी : विरोधकांचे बारीक लक्ष

बीड । प्रतिनिधी

**आगामी होणाऱ्या नगरपालिका, जिल्हा परिषद- पंचायत समिती यांच्या निवडणुकांसाठी सर्वच पक्षांनी मोर्चे बांधणी सुरू केली असताना पालकमंत्री असलेल्या अजित दादांच्या राष्ट्रवादीमध्ये सरळ सरळ दोन गट पडल्याचे दिसत आहे. जिल्हाध्यक्षांचा कारभार म्हणजे मला पहा आणि पानफुले वहा यापेक्षा अधिक नसल्याचे बोलले जात असून, शुक्रवारी विधानसभा अध्यक्षांची बैठक झाल्यानंतर आता रविवारी जिल्हाध्यक्षा दुसऱ्या गटाची बैठक होत असल्याने अजित दादांच्या राष्ट्रवादीत बीडमध्ये दोन गट पडल्याचे आता स्पष्ट झाले आहे.**

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष आणि राज्याचे उपमुख्यमंत्री आणि बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजित दादा पवार यांच्या पक्षाचे बीड जिल्ह्यामध्ये तीन आमदार आहेत. त्यामुळे बीड जिल्ह्यात अजित पवार यांच्या राष्ट्रवादीची ताकद मोठ्या प्रमाणात आहे. मात्र नुकत्याच आगामी होणाऱ्या नगरपालिका, जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांच्या निवडणुकीसाठी स्थानिक पातळीवर जिल्हाध्यक्ष बैठका ▶▶ पान २ वर



### जिल्हाध्यक्ष म्हणजे मला पहा अन पानफुले वहा

राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे जिल्हाध्यक्ष राजेश्वर चव्हाण यांची जिल्ह्यातील पदाधिकारी पक्ष पातळीवर कोणतीच पकड नसल्याचे दिसत आहे. बीड मुख्यालय आहे मात्र जिल्हाध्यक्ष परळी आणि अंबाजोगाई याच भागात अधिक असतात. ते ना माध्यमाच्या ना कार्यकर्त्यांच्या संपर्कात असतात. केवळ राज्य पातळीवरील आणि जिल्ह्यातील नेते आले तरच त्यांचे अनेकांना दर्शन होते. राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष म्हणजे मला पहा आणि पानफुले वहा यापेक्षा अधिक काहीच नसल्याचे आता पदाधिकारीच बोलत आहेत.

## काँग्रेसचे २० ऑक्टोबरला राज्यभर पिठलं भाकर आंदोलन

मुंबई । प्रतिनिधी

राज्यातील बळीराजावर यावर्षी मोठे संकट ओढवले आहे. शेतकरी उद्ध्वस्थ झाला असताना त्याला भरीव पॅकेज व कर्जमाफी देण्याची आवश्यकता होती. परंतु सरकारने जाहीर केलेले पॅकेज अत्यंत तुटपुंजे आहे आणि जे जाहीर केले तेही शेतकऱ्यांना अद्याप मिळालेले नाही. या परिस्थितीला शेतकरी विरोधी महायुती सरकारच जबाबदार आहे. भाजपा महायुती सरकारचा धिक्कार करण्यासाठी काँग्रेस पक्ष ▶▶ पान २ वर

## पाटोद्यातील गायरान जमीन अतिक्रमण

### जिल्हाधिकाऱ्यांनी सहा महिन्यात निर्णय घ्यावा-न्यायालय

छ.संभाजीनगर । प्रतिनिधी

**पाटोदा शहरातील मध्यवर्ती ठिकाणी असलेल्या सर्वे नंबर ७१५ या तब्बल ३८ एकर ३३ गुंठे शासकीय (गायरान) जमिनीवरील अतिक्रमणांबाबत करण्यात आलेल्या तक्रारीवर ६ महिन्यांत निर्णय घ्यावा, असा स्पष्ट आदेश माननीय उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठाने जिल्हाधिकारी बीड यांना दिला आहे.** ▶▶ पान २ वर




## महाआघाडीला धक्का, झारखंड मुक्ती मोर्चा स्वबळावर लढणार

पाटणा । प्रतिनिधी

बिहार विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर महाआघाडीतील जागावाटपावरून सुरू असलेल्या चर्चेदरम्यान एका घटक पक्षाने मोठा निर्णय घेतला आहे. झारखंड मुक्ती मोर्चाने (झामुमो) बिहारमध्ये स्वतंत्रपणे निवडणूक लढवण्याची घोषणा केली आहे, ज्यामुळे महाआघाडीला मोठा धक्का बसला आहे. शेजारील राज्य झारखंडमधील सत्ताधारी पक्ष असलेल्या झामुमोचे महासचिव यांनी दिलेल्या माहितीनुसार, पक्ष बिहारमधील सहा विधानसभा मतदारसंघांत आपले उमेदवार उभे करणार आहे. या जागांमध्ये चकाई, धमदाहा, कटोरिया (अनुसूचित जमातीसाठी राखीव), मनिहारी (अनुसूचित जमातीसाठी राखीव), जमुई आणि पीरपैंती या मतदारसंघांचा समावेश आहे.

## तर भुजबळांनी मंत्रिमंडळाच्या बाहेर पडावे-अंबादास दानवे

छ.संभाजीनगर । प्रतिनिधी

माजी विरोधीपक्षनेते आणि शिवसेना उबाठा पक्षाचे नेते अंबादास दानवे यांनी मंत्री भुजबळ यांना सवाल केला आहे. मंत्री मंडळाच्या निर्णयाला विरोध आहे तर मग मंत्रिमंडळात का रहता, असा प्रश्न उपस्थित करत राजीनामा देण्याचे त्यांनी सूचवले आहे. तसेच, भुजबळ हे जामिनावर बाहेर असून त्यांचा जामीन रद्द होऊ शकतो, असा इशाराही त्यांनी दिला आहे.

बीडमध्ये ओबीसी समाजाचा मोठा मेळावा संपन्न झाला यावेळी ओबीसी नेते आक्रमक ▶▶ पान २ वर

## पंकजा मुंडे यांनी अनाथ मुलांसोबत केली दिवाळी साजरी

### मुलांसोबत पणती रंगविण्यात अन् आकाश कंदील बनविण्यात घेतला सहभाग

मुंबई । प्रतिनिधी

**दिवाळीचा सण म्हणजे फक्त दिव्यांचा, फटाक्यांचा किंवा सजावटीचा उत्सव नाही तर तो माणुसकीचा, प्रेमाचा आणि एकोप्याचा उत्सव आहे, हा विचार करून पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री ना.पंकजाताई** ▶▶ पान २ वर



## बाजारभाव

**कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.१७ ऑक्टोबर २०२५**

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ३८.५० क्विंटल | २,३०० | २,७६० | २,५४३ |
| ज्वारी/हायब्रिड : ९२.५० क्विंटल | २,३०० | ३,२०० | २,६४४ |
| मका/लोकलः ७.५० क्विंटल | २,२५० | २,२५० | २,२५० |
| तूर : १.५० क्विंटल | ६,१२५ | ६,१२५ | ६,१२५ |
| उडीद : २.५० क्विंटल | ४,००० | ५,२१० | ४,६०५ |
| बाजरी: ४१.०० क्विंटल | २,००० | २,८०० | २,५५८ |
| मुग: १.५० क्विंटल | ४,५०० | ४,५०० | ४,५०० |
| सोयाबीन: ५०९.५० क्विंटल | २,४५० | ४,१९० | ३,८८४ |
| हरभरा: २.०० क्विंटल | ४,००० | ५,४०० | ४,७६६ |

# युती पक्की, ठाकरे उडवतील ठिकऱ्या संजय राऊतांचा महायुतीवर हल्लाबोल

मुंबई । प्रतिनिधी

**''आम्ही एकत्र राहण्यासाठी एकत्र आलो आहोत, असे जेव्हा उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे सांगतात तेव्हा ते पुन्हा एकत्र येणार का, हे बोलणे योग्य नाही. ठाकरे बंधुंची युक्ती पक्की आहे. ठाणे महापालिकेसाठी आपकी बार ७५ पार हा नारा आम्ही देतो. ते म्हणतील त्याच्यापेक्षा पाच आम्ही जास्त सांगू, ठाण्यात मनसे आणि शिवसेना एकत्र लढणार आणि जेव्हा दोन भाऊ एकत्र येणार तेव्हा आमची ताकद दिसेल, ठाकरे विरोधकांच्या ठिकऱ्या उडवतील, अशा शब्दांमध्ये शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी शनिवारी (दि.१८) महायुतीवर हल्लाबोल केला.**




दीपोत्सव हे मुंबईचे आकर्षण आहे. मराठी ऐक्याचा हा उत्सव आहे. वातावरण उत्साही आनंदी होते. हा आनंद असाच राहील. मराठी माणसाच्या प्रश्नासाठी राज- उद्धव ठाकरे एकत्र पाहायला मिळतील, असेही राऊत म्हणाले. काँग्रेसचे अनेक नेते संयुक्त महाराष्ट्र लढ्यात होते. काँग्रेस, राष्ट्रवादी मराठी नाहीत का?, असा सवाल करत काँग्रेस हा राष्ट्रीय पक्ष आहे. त्यांची वर्किंग कमिटी असते. स्वातंत्र्य ▶▶ पान २ वर

## धनगर एसटी आरक्षणासाठी मांजसुबा येथील आनंद कोकाटेने केली आत्महत्या

बीड । प्रतिनिधी

**रानावनात राहून मेंढपाळ करत जीवन जगत असलेल्या धनगर समाजाला एसटी आरक्षण देण्यात यावे यासाठी बीड तालुक्यातील मांजरसुबा येथील तरुण आनंद न्यायमूर्ती कोकाटे (वय ३८ वर्षे) याने राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केली.**



राज्य शासनाने धनगर समाजाला अनुसूचित जमाती प्रवर्गातून आरक्षण द्यावे, यासाठी काढण्यात आलेल्या प्रत्येक मोर्चा मध्ये आणि आंदोलनात आनंद कोकाटे हे सक्रिय सहभाग घेत असायचे. शासनाने हैद्राबाद गॅझेट नुसार मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र दिल्याने ओबीसी आरक्षण संपुष्टात आले. आणि इकडे धनगर समाजाला अनुसूचित जमातीमध्ये आरक्षण मिळत नाही आता आपल्या समाजाचे काय होणार, मुलांना नोकरी लागणार नसून धनगड्यांच्या ▶▶ पान २ वर

अग्रलेख

# कायद्याचा गैरवापर चिंताजनकच

काही बाबतीत समाजात दोन टोके आढळतात. महिलांसाठीचे कायदे हे त्यापैकी एक उदाहरण म्हटले जाऊ शकेल. महिलांना दुय्यमत्व आणि अन्याय सहन करावा लागतो. त्याच्या परिमार्जनासाठी कायदे आवश्यकच आहेत, असे महिला चळवळी मानतात तर अनेक महिला कायद्यांचा गैरवापर करतात, अशी तक्रार पुरुष संघटना करतात. जशा महिलांवर अन्याय झाल्याच्या असंख्य घटना सांगितल्या जाऊ शकतात, तद्वतच अन्याय झाल्याची तक्रार पुरुषांनी केल्याच्या घटनांमध्ये वाढ आढळते. नुकतीच नागपूरमध्ये एका युवकाने आत्महत्या केली. ज्याची चर्चा सर्वत्र होत आहे.

कायदे महिलांच्या बाजूने असल्याची धमकी प्रेयसी द्यायची आणि विवाह करण्यासाठी दबाव आणायची, असे त्याने चिठ्ठीत लिहून ठेवले. त्याने थेट पंतप्रधानांना टॅग केले आहे. या घटनेचे सविस्तर वर्णन माध्यमांत प्रसिद्ध झाले आहे. महिलांसंदर्भातील कायद्यांच्या गैरवापराकडे अंगुलीनिर्देश करणाऱ्या अशा घटना अधूनमधून घडतात. न्यायसंस्थादेखील तसे निरीक्षण नोंदवतात. ४९८-अ या कलमाचा काही महिला प्रसंगी शस्त्रासारखा वापर करतात, असे मत सर्वोच्च न्यायालयाने व्यक्त केले आहे. गेल्या वर्षी घडलेल्या बंगळुरू घटनेने तर देशात खळबळ माजवली होती. हे झाले एक टोक. तर दुसऱ्या बाजूला एनसीआरबीच्या २०२३ च्या आकडेवारीनुसार, देशात हुंड्यासंबंधी गुन्ह्यांच्या घटनांत गत वर्षाच्या तुलनेत सुमारे १४ टक्क्यांनी वाढ नोंदवली गेली. महिलांविरोधात गुन्ह्यांची संख्याही वाढत आहे. याशिवाय, महिलांना कायमच दुय्यमत्व सहन करावे लागते ते वेगळेच. कौशल्य आणि क्षमता असूनही सतत वेड्याचे सोंग घेणे त्यांच्यासाठी वाटते तितके सोपे नसते. तात्पर्य, महिलांना न्याय मिळवून देण्यासाठी कायदे गरजेचे आहेत यात दुमत नाही. पण अनेक महिला त्यांचा गैरवापर करू लागल्या आहेत, हा खरा प्रश्न आहे. हे विशेषत्वाने महिलांसाठी काम करणाऱ्या संघटनांपुढचे आव्हान ठरावे. समाजाच्या दृष्टीने हा विषय खूप संवेदनशील आहे. महिलांवर वर्षानुवर्षे अन्याय होतो. त्यांची हेटाळणी केली जाते. कुटुंब आणि समाजात त्यांना त्यांचे स्थान नाकारले जाते हे वास्तव आहे. कायद्यांचे पाठबळ महिलांना दाद मागण्याची प्रेरणा देते. पण काळ बदलला आहे.

युवा पिढीचे विचार आणि दृष्टिकोन बदलत आहेत. तथापि पुरुष अन्याय करतात आणि महिला मात्र अन्याय सहन करणाऱ्या हे गेल्या काही वर्षांत उभे राहिलेले चित्र समाजाच्या मानसिकतेत आजही तितकेच ठाशीव आढळते. तथापि बदलत्या काळानुसार सगळ्यांना त्याच तराजूत तोलले जाऊ शकेल का? याच मुद्यांवर विशेषतः समाज माध्यमांवर तरुण मुले तीव्र मते व्यक्त करतात. विविध घटना त्या मतांचे गांभीर्य वाढवणाऱ्या ठरतात. पुरुष हक्क समिती अस्तित्वात आली तेव्हा तो चेष्टेचा विषय ठरला होता. पण हळूहळू त्या संघटनेने पाळेमुळे रोवली. पुरुषांचा मोठ्या प्रमाणात पाठिंबा मिळाला. उपरोक्त घटनांच्या पार्श्वभूमीवर त्याला 'फॅड' मानले जाऊ शकेल का? तेव्हा मत कोणतेही असो, टोकाचे विचार किंवा आचरण फक्त अनर्थाचे कारण ठरतात. असेच घडत राहिले तर महिलांसंदर्भातील कायद्यांमध्ये बदल करण्याची मागणी जोर धरू शकेल. तसे घडणे खऱ्या अन्यायग्रस्त महिलांसाठी अन्यायकारकच ठरेल. सध्याची पंचविशीची मुले विवाहाविषयी संभ्रमावस्थेत आढळतात. अनौपचारिक गप्पांमध्ये ते त्यांना वाटणारी भीती व्यक्त करतात. विवाहच करू नये, असेही ते म्हणतात. तरुण मुले तसा विचार करू लागली असतील तर तेही टोकच नाही का? पण ते तसा विचार का करत असू शकतील, याचाही वेध घेणे सामाजिक समतोलाच्या दृष्टीने आवश्यकच मानले जायला हवे. कायद्यांच्या गैरवापराची तक्रार याच्या मुळाशी असू शकेल का? सहन न करता अन्यायाविरुद्ध दाद मागणे हा पीडित महिलांचा कायदेशीर हक्क मानला जातो. खऱ्या अन्यायग्रस्त महिला कायद्याच्याच आधारे अन्याय सहन करण्याचे नाकारतात. पण कायद्यांचा गैरवापर कायद्यांच्या उद्देशालाच सुरुंग लावतो. तेव्हा यात सुवर्णमध्य साधण्याची आवश्यकता आहे. कायद्याच्या गैरवापराला आळा घालणे ही सरकार, जाणते आणि महिला संघटनांची जबाबदारी आहे.

## आरक्षण रद्द होण्याच्या भीतीने मराठा युवकाची आत्महत्या

**बीड । प्रतिनिधी**

**मराठा समाजाला मिळालेले कुणबी आरक्षण रद्द होईल की काय, या भीतीने बीड तालुक्यातील वरवटी येथील एका २३ वर्षीय युवकाने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना काल (दि. १७) दुपारी ५ वाजण्याच्या सुमारास घडली आहे. विष्णु (शाम) परमेश्वर कोटुळे असे आत्महत्या केलेल्या युवकाचे नाव आहे.**

मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र देऊन शासनाने दिलेल्या आरक्षणावर नुकत्याच झालेल्या ओबीसींच्या मेळाव्यातून प्रश्नचिन्ह निर्माण झाले होते. याच नैराश्यातून विष्णु कोटुळे याने टोकाचे पाऊल उचलल्याचे समोर आले आहे. वरवटी येथील रहिवासी असलेला विष्णु (शाम) परमेश्वर कोटुळे (वय २३) या युवकाने काल दुपारी ५ वाजेच्या सुमारास घरात गळफास लावून घेतला.



मराठा समाजाला 'हैदराबाद गॅझेट'नुसार मिळालेले कुणबी आरक्षण रद्द होईल की काय, तसेच बीड येथील नुकत्याच झालेल्या ओबीसींच्या मेळाव्यामुळे आरक्षणावर विपरीत परिणाम होईल, या चिंतेतून त्याने हे पाऊल उचलल्याची माहिती मिळाली आहे. विष्णु कोटुळेच्या खिशात पोलिसांना एक चिठ्ठी मिळाली आहे. त्यामध्ये त्याने आत्महत्या करण्याचे स्पष्ट कारण नमूद केले आहे. चिठ्ठीत त्याने लिहिले आहे की, ''मराठा समाजाला कुणबी म्हणून शासनाने काही दिवसापूर्वी जीआर काढला होता, परंतु काल बीडला झालेल्या ओबीसीच्या महायलगार मेळाव्यामुळे मराठा समाजाला दिलेला जीआर (आरक्षण) रद्द होणार व पुन्हा आम्हाला नोकरी मिळणार नाही या नैराश्यातून मी आज आत्महत्या करत आहे.'' पुढे त्याने आपल्या समाजासाठी अत्यंत कळकळीची मागणी केली आहे. तो म्हणतो, ''माझा मराठा समाज खूप गरीब आहे, मराठा समाजाला दिलेले आरक्षण टिकले नाही तर माझ्यासारखे अनेक मराठा बांधव आत्महत्या करतील.'' आरक्षण टिकणार की नाही या भीतीने एका तरुण मराठा युवकाने आपले जीवन संपवल्याने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. या घटनेने बीड जिल्ह्यात खळबळ उडाली असून आरक्षणाच्या मुद्द्यावरून समाजात निर्माण झालेल्या गंभीर परिस्थितीचे दर्शन घडवले आहे. या घटनेबाबत अधिक तपास पोलीस करत आहेत.

## अंभोरा पोलिस ठाणे हद्दीत गोळीबार ?

**अंभोरा । प्रतिनिधी**

**हिवरा रस्त्यावर तरूणांचा मृतदेह आढळून आला असुन त्याच्या छातीत गोळी झाडल्याचे प्रत्यक्षदर्शनी दिसत असून मृतदेहाजवळ दुचाकीसह विनापरवाना पिस्टल आढळून आल्याची खळबळजनक घटना अंभोरा पोलिस ठाणे हद्दीत घडली आहे.बाळा रामदास चव्हाण असे मृत तरूणाचे नाव आहे.**

आष्टी तालुक्यातील वाघळुज येथील मयुर उर्फ बाळा रामदास चव्हाण वय वर्ष ३५ याचा अभोरा-हिवरा रस्त्यावरील कच्च्या रोडलगत सकाळी साडेदहाच्या दरम्यान मृतदेह आढळून आल्याचे येणाऱ्या जाणाऱ्या काही लोकांना दिसल्याने पोलिसांना घटनेची माहिती देण्यात आली. पोलिसांनी लागलीच घटनास्थळाची पाहणी केल्यानंतर एक दुचाकी रोडच्या कडेला लावलेली व छातीत गोळी लागल्याचे आणि मृतदेहाजवळ पिस्टल आढळून आल्याचे दिसून आले.ही हत्या असावी की आत्महत्या हे अद्याप समजले नसले तरी मृत्यूचे गुढ कायम आहे. घटनास्थळी आष्टीचे उपअधीक्षक बाळकृष्ण हनपुडे,अंभोरा ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक मंगेश साळवे,पोलीस उपनिरीक्षक चंद्रकांत तावरे,आदिनाथ भडके,पोलीस हवालदार बाबासाहेब गर्जे, पोलीस अमलदार शिवदास केदार, अमोल ढवळे, उपस्थित होते.

## पान ६ वरून...

### दिव्यांग बांधवांच्या

वितरण करण्यात आले. यापुर्वी ४० दिव्यांग लाभार्थ्यांना मंजुरी पत्राचे वाटप करण्यात आले होते. आ. विजयसिंह पंडित यांच्या माध्यमातुन दिव्यांग बांधवांचे प्रश्न मार्गी लागत असल्याचे समाधान यावेळी लाभार्थ्यांच्या चेहऱ्यावर दिसत होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक नायब तहसिलदार संजय सोनवणे यांनी केले. कार्यक्रमाला गेवराई तालुक्यातील दिव्यांग बांधव व त्यांचे नातेवाईक मोठ्या संख्येने उपस्थित होते. माजी आमदार अमरसिंह पंडित यांनी उपस्थितांना दिपावलीच्या शुभेच्छा दिल्या तर शिवछत्र परिवाराच्या वतीने दिपावली निमित्त आयोजित केलेल्या स्नेहभोजनाचा लाभ दिव्यांग बांधव व उपस्थितांनी घेतला. यावेळी बोलतांना अमरसिंह पंडित म्हणाले की, येणाऱ्या काळात गेवराई विधानसभा मतदार संघातील एकही दिव्यांग बांधव शासनाच्या रास्त योजनेच्या लाभापासुन वंचित राहणार नाही याची आपण काळजी घेवु. गेवराई येथील कार्यालयात सुरु केलेल्या दिव्यांग कक्षाची माहिती देवुन कोणत्याही कार्यालयात दिव्यांग बांधवांची आडवणुक होत असल्यास थेट संपर्क करण्याचे आवाहन त्यांनी यावेळी केले. गेवराई नगर परिषदेच्या वतीने शहरात दिव्यांग बांधवांना दिला जाणारा दिव्यांग निधी अनेक वर्षापासुन थकीत होता, तो हक्काचा निधी वाटप करुन त्यांना न्याय देण्याचे काम आपण केल्याचेही यावेळी अमरसिंह पंडित यांनी सांगितले. महायुती सरकारने दिव्यांग बांधवांच्या मानधनामध्ये घसघसीत वाढ केली असुन आता प्रतिमाह आडीच हजार रुपये मानधन मिळणार असल्याचे सांगतांना अमरसिंह पंडित यांनी महायुती सरकारचे आभार मानले. कार्यक्रमाला गेवराई तालुक्यातील दिव्यांग बांधव व त्यांचे नातेवाईक मोठ्या संख्येने उपस्थित होते. शिवछत्र परिवाराने आयोजित केलेल्या स्नेहभोजनाचा लाभ यावेळी त्यांनी घेतला. बाजार समितीचे उपसभापती श्रीहरी पवार, संग्राम आहेर, श्रीराम आरगडे, रफीक सौदागर, बाबासाहेब चव्हाण, राधाकिसन चक्कर, महेश ढेरे, बाबासाहेब खोसे, दादासाहेब घोडके, सुभाष गुंजाळ यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेसचे पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

--------------

### हिंदू मुस्लिम महिलांचा

मानणारा जिल्हा आहे. परंतु शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे साहेबांनी ज्यांना आशीर्वाद देऊन मोठे केले त्यांनी पुढे चालून पक्षासोबत बेईमानी केली परंतु जे निष्ठावंत शिवसैनिक होते किंबहुना आहेत त्यांनी मात्र पक्षाचे इमान कधीही सोडले नाही. जिल्हाप्रमुख गणेश वरेकर हे सुद्धा अत्यंत पोट तिडकेने काम करत आहेत आज बीड शहरातून एवढ्या मोठ्या प्रमाणात हिंदू मुस्लिम महिला एकवटून संभाजीनगर सारखे ठिकाणी प्रवेश करण्यासाठी येतात हे कशाचं धोतक आहे. आता इथून पुढे एक दिलाने काम करून येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाकरिता यश प्राप्त करण्यासाठी मी सुद्धा बीड जिल्ह्यावर वैयक्तिक लक्ष घालत असून शिवसेनेला पूर्वीसारखे गतवैभव प्राप्त करून देण्यासाठी मी कायम पाठीशी आहे.पुन्हा एकदा आपल्याला तळागाळातील बांधणी करायची असून सर्व शिवसेना पदाधिकाऱ्यांनी इमाने इतबारे काम करावे व पक्ष संघटना वाढवण्यासाठी साथ द्यावी. यावेळी तालुकाप्रमुख गोरख अण्णा सिंघन, नुजाहत सिद्दिकी, शेख यास्मिन, बिलाल भाई, यांनी आपले मनोगत व्यक्त केले. या प्रवेश सोहळ्याच्या कार्यक्रमाला बीड शहरातील हिंदू मुस्लिम महिला व व पुरुष शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

-----------

### दीपावली निमित्त आष्टी

मॅनेजमेंटचे अशपाक आतार यांच्या भाई भाई स्टॉलवर नागरिकांनी मोठी गर्दी केली होती आष्टीतील छत्रपती शिवाजी चौकामध्ये व शनी मंदिरासमोरील प्रेक्षणीय भागात लोकनेते मराठवाडा भूषण आमदार सुरेश आण्णा धस यांचे फोटोचे आकर्षण आकाश कंदील लावले आहेत हे देखील शहरांमध्ये एक आकर्षक रोषनाई दिसून येत आहे हिंदू धर्मात सर्वात महत्त्वाचा व हर्षवल्लासाचा दिवाळी सण आहे प्रत्येक गोरगरीब जो तो आपल्या परीने हा दिवाळीचा सण नवे कपडे घरामध्ये आकर्षक रोषणाई फराळाची पदार्थ सर्व करून दिवाळी सण साजरा करतात.

--------------

### राक्षसवाडी ग्रामस्थांना स्वामी

कुलकर्णी याने क्लासिकल व पाश्चिमात्य संगिताचे मिलाफ दर्शवणारे (फ्युजन तबला वादन) सादर केले. शाळा नैतिक मूल्य, संस्कार रुजवणारे व सुसंस्कृत जीवनशैलीचा आदर्श घालून देणारे केंद्र असते. स्वामी विवेकानंद बाल विद्यामंदिर शाळा अशाच समाज व देश घडवण्याच्या आदर्शांवर चालणारी शाळा आहे. असे प्रतिपादन प्रसिद्ध कवी व प्राध्यापक आदरणीय श्री मुकुंद राजपंखे सर यांनी केले व शाळा रुजवत असलेल्या संस्कारांचे भरभरून कौतुक केले. या कार्यक्रमास नवक्षितीज बहुउद्देशीय शिक्षण संस्थेच्या अध्यक्षा श्रीमती स्वरूपाताई डिग्रसकर, संस्थेचे सचिव श्री. संतोष दादा कुलकर्णी तसेच प्रमुख अतिथी म्हणून श्री. प्रसाद (दादा) कुलकर्णी (गायक) श्रीमती हेबाळकर बाई (खोलेश्वर प्राथमिक विद्यालयाच्या माजी मुख्याध्यापिका, रा. स्वंयसेविका, दिनदयाळ बँकेच्या संचालिका), डॉ. राजेश इंगोले सर (डॉ. मानसोपचार तज्ज्ञ), अॅड. मकरंद पत्की (दिनदयाळ बँकेचे अध्यक्ष), डॉ. अतुल देशपांडे (माजी नगरसेवक (भाशिप्र) चे कार्यवाहक), प्रा. राजपंखे सर (प्रसिद्ध, कवी, गझलकार), श्रीमती रोहिणी पाठक मॅडम ( अध्यक्षा, रोटरी क्लब ऑफ अंबाजोगाई सिटीच्या) , स्वामी विवेकानंद शाळेतील शिक्षक, विद्यार्थी व पालक उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन श्रीमती निशीगंधाताई जोगदंड, निवेदन कु. वेदिका माले व कु. श्रावणी माहूरकर तर आभारप्रदर्शन श्री. उल्हास दादा रामदासी यांनी केले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी स्वामी विवेकानंद परिवाराने कष्ट घेतले.

--------------

### चांदणे शिंपीत जाशी ते

उपशास्त्रीय व सुगम गायनास श्रोत्रे भरभरून दाद देत होते.

राग दुर्गा , भक्तीगीत , नाट्यगीत , गझल या प्रकारांनी वेद ने जिंकले.

''कैवल्याच्या चांदण्याला भुकेला चकोर '' या भैरवीने मैफलीने पुर्ण विराम घेतला.

चि. पवार , महेश कराड , संमिहन जोशी ,कुणाल कुलकर्णी , नरहरी दळे यांची साथ संगत रंगत दार होती. सुरेश भानप , प्रशांत भानप , दिगंबर महाजन , रंगनाथ सावंत , सखाराम जोशी , प्राणेश पोरे , राजेश देशपांडे , अनिकेत भिलेगावकर , बी. एस देशपांडे , स्मिता लिंबगावकर , पंढरीनाथ जोशी , संजय कुलकर्णी प्रभाकर साळेगावकर, मीनाक्षी निळेकर निरंजन वाघमारे ,यांनी परिश्रम पुर्वक नियोजन केले. सभागृहात विश्वास जोशी , सुमंत गायकवाड , विजय ठोसर , किशोर गुंजकर , प्रकाश पोतदार , रमेश गटकळ , अशोकराव रत्न पारखी. यांच्या अनेक मान्यवर रसिक उपस्थित होते.

--------------

### रामलिंग पतसंस्थेला

नुकताच एका भव्य कार्यक्रमामध्ये गोकर्ण महाबळेश्वर कुमठा, कर्नाटक याठिकाणी मान्यवरांच्या उपस्थितीत व हस्ते प्रदान करण्यात आला.

वडवणी येथिल रामलिंग नागरी सहकारी पतसंस्था म.ता.वडवणी या पतसंस्थेने बीड जिल्ह्याच्या नव्हे तर मराठवाड्याच्या सहकार क्षेत्रात आपल्या पारदर्शक, तत्पर व विनम्र सेवेतून हजारो ग्राहकांचा विश्वास संपादन करीत सहकाराचे मोठे जाळे विणले आहे. अनेक अभिनव व सामाजिक उपक्रमांतून पतसंस्थेने आपली वेगळेपणाची चुणूक नेहमीच दाखवली आहे. तसेच पतसंस्थेच्या उत्तम कामगिरीतून राज्याच्या सहकार क्षेत्राचे लक्ष आपल्याकडे वेधले आहे. संपूर्ण महाराष्ट्र राज्यातील सहकार क्षेत्रात महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशन लि. यांच्या वतीने दिला जाणारा दिपस्तंभ पुरस्कार हा सन्मान अतिशय महत्त्वाचा, प्रतिष्ठेचा व बहूमानाचा मानला जातो. रामलिंग पतसंस्थेने या अगोदर चार वेळेस सन २०१८-१९, २०१९-२०, २०२०-२१, २०२३-२४ चा राज्यस्तरीय दिपस्तंभ पुरस्कार मिळवला होता. त्यानंतर यावर्षीही पाचव्यांदा दिपस्तंभ पुरस्कार सन २०२४-२५ हा पुरस्कार मिळवला असून छत्रपती संभाजीनगर विभागातील ५० कोटी ते १०० कोटी या गटामधून हा दिपस्तंभ पुरस्कार रामलिंग पतसंस्था वडवणी यांना काही दिवसांपूर्वीच जाहीर झाला होता. एका भव्य कार्यक्रमामध्ये कर्नाटक राज्यातील गोकर्ण महाबळेश्वर कुमठा येथील डेनिसन्स रिसार्ट याठिकाणी दि.१३ ऑक्टोबर २०२५ रोजी मान्यवरांच्या उपस्थितीत व हस्ते हा प्रदान करण्यात आला. याप्रसंगी महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशनचे अध्यक्ष ओमप्रकाश दादाप्पा उर्फ काकासाहेब कोयटे, मुख्य कार्यकारी अधिकारी सौ.सुरेखा लवांडे, कर्नाटक राज्य सहकारी पतसंस्था महासंघ लि.बंगळूरुचे अध्यक्ष चंद्रशेखर सी.एस., कर्नाटक राज्य सौहार्दा फेडरल सहकारी लि.बंगळूरुचे अध्यक्ष जी.नंजना गौडा, संयुक्त निबंधक सहकारी विभाग बेळगांव प्रांत कलाप्पा ओबँगोल, माजी सहकार आयुक्त महाराष्ट्र राज्य श्रीकृष्ण वाडेकर, सहकार आयुक्त कर्नाटक संजय हौसमठ इत्यादी अनेक उपस्थित होते. या मान्यवरांच्या हस्ते रामलिंग पतसंस्थेला हा राज्यस्तरीय दिपस्तंभ पुरस्कार सन्मानचिन्ह, सन्मानपत्र, पुष्पगूच्छ देवून सन्मान करत प्रदान करण्यात आला. हा पुरस्कार स्विकारण्यासाठी चेअरमन नारायणराव डिगे, व्यवस्थापक दिगांबर गुरसाळी, सर्वश्री संचालक कचरुशेठ झाडे, सुरेशराव ढवळशंक, नवनाथराव म्हेत्रे, अरुणराव गुरसाळी, प्रकाशराव डिगे, उपमन्यूजी वारे, वैजनाथ डिगे, सुभाषराव वाव्हळ, बाबासाहेब मस्के, शिवाजीराव टकले, अर्जुनराव भंडारे हे उपस्थित होते. दरम्यान रामलिंग पतसंस्थेच्या आजवरच्या यशस्वी वाटचालीत सर्व सभासद बंधु व हजारो ग्राहकांचा सिंहाचा वाटा असून सर्वांच्या विश्वासार्हतेला व उदंड सहकाऱ्याला हा पुरस्कार अर्पण असून सर्वांचा विश्वास हिच आमची खरी शक्ती असल्याचे मत चेअरमन नारायणराव डिगे यांनी पुरस्कार स्विकारतांना व्यक्त केले व पुरस्काराबध्दल महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशनचे आभार मानले. दरम्यान वडवणी तालुक्यासारख्या ग्रामीण भागातून सहकार क्षेत्रात उत्तुंग गरुडझेप घेणाऱ्या रामलिंग पतसंस्थेच्या या पाचव्या वेळेस मिळविलेल्या राज्यस्तरीय दिपस्तंभ पुरस्काराच्या यशाबध्दल पतसंस्थेचे चेअरमन नारायणराव डिगे, व्यवस्थापक दिगांबर गुरसाळी, सर्वश्री संचालक कचरुशेठ झाडे, सर्जेराव महाराज आळणे, सुरेशराव ढवळशंक, नवनाथराव म्हेत्रे, अरुणराव गुरसाळी, प्रकाशराव डिगे, उपमन्यूजी वारे, वैजनाथ डिगे, सुभाषराव वाव्हळ, बाबासाहेब मस्के, शिवाजीराव टकले, अर्जुनराव भंडारे व सर्व कर्मचारी वृंद यांचे सर्वत्र अभिनंदन व कौतुक होत आहे.

--------------

### धनंजय मुंडेंनी निष्ठेच्या

हाकेंचा समाचार घेतला. लक्ष्मण हाकेंनी बीडमध्ये येवून मोठ्या वल्गना करत जावू नयेत, हाकेंना त्यांच्या मतदारसंघात २५३ मते मिळाली आहेत ते काय आम्हाला मदत करणार. असा सवाल उपस्थित केला.

**भुजबळांनी मंत्रीपद सोडून बोलायला पाहिजे**

बीडच्या ओबीसीच्या मेळाव्यात छगन भुजबळ जे बोलले, ते कितपत योग्य आहे. कारण तेच मंत्री आहेत. मंत्रिमंडळामध्ये असताना हैदराबाद गॅझेटचा जीआर कॅबिनेटचा निर्णय होता. तरी तुम्ही मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांच्या विरोधात बोलता, त्यांनी त्यांचे मत व्यक्त करावे, त्यांनी बोलावे पण मंत्रीपद सोडून असा प्रतिहल्ला आ.प्रकाश सोळंके यांनी केला.

-------------

### लोकनेते स्व.गोपिनाथ मुंडे

करण्यात आला.मनोगतात शुभम धुत व राहुल बोरा म्हणाले बीड जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष शिवाजी भाऊ फड यांनी सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून सुरू केलेले हे दोन्ही प्रकल्पांना संस्थेचे मुख्य प्रवर्तक चंद्रकांत फड,व नितीन फड आपल्या मेहनतीने अधिक पुढे घेऊन जातील अश्या सदिच्छा आम्ही देतो..व भविष्यात अश्या त्यांच्या चांगल्या संकल्पांच्या पाठिशी सदैव साथ देऊ.यावेळी सर्वश्री आथीती डॉ सुरेंद्र बजाज,राजुसेठ बंब, जितेंद्र बोरा,राज धुत, शुभम कातागळे, वृशभ वाघमारे, गिरीश मुंदडा, संकेत करवा, डॉ वैभव कवठेकर सागर भैया उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रकल्प अधिकारी प्रा.आजिनाथ शेरकर यांनी केले या वेळी आश्रमाच्या व्यवस्थापक वर्षा शेरकर यांच्या सह रामनाथ मुळे,शहादेव फड, गोरख फड, अमोल नेहरकर यांनी परीश्रम घेतले.

## पान १ वरून...

### अतिवृष्टीबाधित शेतकऱ्यांना

रुपयांच्या वितरणास मान्यता देण्यात आली आहे. तर चंद्रपूर जिल्ह्यासाठी ६९ कोटी ४६ लाख ८६ हजार, वर्धासाठी १४२ कोटी ४० लाख ११ हजार, भंडारा जिल्हासाठी १० कोटी ४८ लाख ३६ हजार, गोंदियासाठी ३ कोटी ५० लाख २१ हजार आणि गडचिरोली जिल्ह्यासाठी २ कोटी ६७ लाख ५४ हजार रुपयांच्या वाटपाला मान्यता देण्यात आली आहे. अमरावती विभागातील अकोला जिल्ह्यासाठी १६२ कोटी ९५ लाख ३४ हजार रुपये, अमरावती जिल्ह्यासाठी ३८ कोटी ४ लाख ५१ हजार रुपये, यवतमाळ जिल्ह्यासाठी २६२ कोटी ८ लाख ४५ हजार रुपयांच्या वितरणाला मान्यता देण्यात आली आहे. पुणे विभागातील सातारा जिल्ह्यासाठी २ कोटी ४९ लाख ५ हजार रुपये, सोलापूर जिल्ह्यासाठी ७७२ कोटी ३६ लाख ४५ हजार, तर पुणे जिल्ह्यासाठी ३४ कोटी ४२ लाख ८७ हजार, सांगली जिल्ह्यासाठी १४ कोटी २३ लाख ५ हजार रुपये वितरणास मान्यता देण्यात आली आहे. नाशिक विभागातील नाशिक जिल्ह्यासाठी ३१७ कोटी १५ लाख ७७ हजार रुपये, धुळे १० कोटी २२ लाख ९७ हजार, नंदुरबारसाठी ५३ लाख ९९ हजार रुपये, जळगाव जिल्ह्यासाठी २९९ कोटी ९४ लाख ४७ हजार रुपये आणि अहिल्यानगर जिल्ह्यासाठी ८४६ कोटी ९६ लाख ८९ हजार रुपयांच्या वितरणास मान्यता देण्यात आली आहे. कोकण विभागातील ठाणे जिल्ह्यासाठी ८ कोटी ३७ लाख ६५ हजार रुपये, पालघर जिल्ह्यासाठी १४ कोटी ४२ लाख ७ हजार रुपये, रायगड जिल्ह्यासाठी ५ कोटी ९ लाख ९ हजार रुपये, रत्नागिरी जिल्ह्यासाठी १३ लाख ५३ हजार रुपये, सिंधुदुर्ग जिल्ह्यासाठी ८ लाख २९ हजार रुपयांच्या वितरणासाठी मान्यता दिली आहे.

--------

### अजित दादाच्या राष्ट्रवादीत

घेत आहेत. विशेषतः बीड ही सर्वात मोठी नगरपालिका असल्याने सर्वांचे लक्ष बीड नगरपालिकेकडे आहे. त्याची तयारी अजित पवार गटाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉक्टर योगेश क्षीरसागर करत आहेत. मात्र त्याला काही जणांकडून अडकाठी घालण्यात येत असल्याचे दिसत आहे. प्रामुख्याने बीड जिल्ह्यामध्ये मराठा - ओबीसी असा मोठ्या प्रमाणात दुरावा निर्माण झाला आहे. आता या दुराव्याची लागण नेतेमंडळीमध्ये झाली असल्याचे त्यांच्या वागण्या बोलण्यावरून दिसून येत आहे. विशेष म्हणजे डॉक्टर योगेश क्षीरसागर हे ओबीसीमध्ये तर इतर काही मात्तबर मराठा समाजाचे असल्याने क्षीरसागर यांना लक्ष्य बनवले जात असल्याचे दिसत आहे. डॉक्टर योगेश क्षीरसागर यांनी मागील दोन दिवसापूर्वी नगरपालिका निवडणुकी संदर्भात मोठी बैठक घेतली. या बैठकीमध्ये त्यांनी ५०% नव तरुणांना निवडणुकीत संधी देण्याचे आश्वासन दिले आणि ज्याप्रमाणे आपण विधानसभा निवडणुकीत लढलो अगदी त्याच ताकतीने नगरपालिका देखील लढणार असल्याचे जाहीर केले. या बैठकीला पक्षातीलच काही नगरसेवकांनी दांडी मारली. मात्र आता जिल्हाध्यक्ष राजेश्वर चव्हाण यांनी अमरसिंह पंडित यांच्या उपस्थितीमध्ये दुसरी बैठक बोलावली आणि बैठक बोलवताना राष्ट्रवादीची खरी बैठक असा शब्दप्रयोग केला आहे, त्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षामध्ये दोन गट पडले हे निश्चित आहे. गेवराईचे माजी आमदार आणि राष्ट्रवादीचे नेते अमरसिंह पंडित यांनी गेवराई बरोबरच आता बीड नगरपालिकेत देखील लक्ष घातल्याचे दिसत आहे. अजित पवार यांच्या राष्ट्रवादीमध्ये सरळ सरळ दोन गट पडल्यानंतर त्यांच्या हालचालीवर काँग्रेस, शिवसेना, राष्ट्रवादी शरद पवार गट लक्ष ठेवून आहेत. बीडला मिळालेले राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष काम कमी आणि देखावा जास्त अशी परिस्थिती असल्याने राष्ट्रवादीत नेमकं काय सुरू आहे हे पक्षातीलच कार्यकर्ते आणि पदाधिकाऱ्यांना समजत नसल्याचे बोलले जात आहे

------------

### संपुर्ण पाकिस्तान ब्राह्मोसच्या

त्यांनी स्पष्ट केले. राजनाथ सिंह म्हणाले की, ब्राह्मोस टीमने फक्त एका महिन्यात दोन देशांसोबत सुमारे ४,००० कोटी रुपयांचे करार केले आहेत. येत्या काही वर्षांत, आपल्याला इतर देशांतील तज्ञ लखनौमध्ये येताना दिसतील. यामुळे यापुढे ज्ञान केंद्र संरक्षण तंत्रज्ञानात आघाडीचे स्थान बनेल. पुढील आर्थिक वर्षापासून ब्राह्मोसच्या लखनौ युनिटची उलाढाल सुमारे ३,००० कोटी रुपये असेल. जीएसटी संकलन दरवर्षी ५,००० कोटी रुपये असेल.'' दरम्यान, १ मे २०२५ रोजी उद्घाटन झालेल्या या अत्याधुनिक युनिटमध्ये क्षेपणास्त्र एकत्रीकरण, चाचणी आणि अंतिम गुणवत्ता तपासणीसाठी सर्व आधुनिक सुविधा आहेत. यशस्वी चाचणीनंतर, क्षेपणास्त्रे भारतीय सशस्त्र दलांच्या तैनातीसाठी तयार आहेत.

---------

### पाटोद्यातील गायरान

या प्रकरणात पाटोदा येथील शेख मोबीन हमीद व सय्यद रियाज युसूफ यांनी अॅड. नरसिंह एल. जाधव यांच्यामार्फत जनहित याचिका क्रमांक २७/२०२५ दाखल केली होती. यामध्ये सांगण्यात आले की, या गायरान जमिनीवर राजकीय वरदहस्त असलेल्या खासगी व्यक्तींनी अनधिकृत बांधकामे व अतिक्रमणे केली असून, प्रशासन याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत आहे. १९७६ साली यातील २८ गुंठे जमीन 'सुंदर सोसायटी बीज उत्पादक संस्था पाटोदा' यांना कार्यालय व गोडाऊनसाठी विशिष्ट अटींसह देण्यात आली होती. मात्र संस्था बंद पडल्यावर, या जागेवर १९८६ पासूनच अतिक्रमणास सुरुवात झाली. त्यानंतरच्या काळात, २०१०-११ पासून माजी जिल्हा परिषद अध्यक्ष सय्यद अब्दुल्ला सय्यद यासीन यांचे कुटुंबीय या जमिनीवर राहत असून, त्यांनी देखील अतिक्रमण करून घर उभारल्याचा आरोप याचिकाकर्त्यांनी केला आहे. सदर तक्रारीवर सहाय्यक निबंधक, तहसीलदार व जिल्हाधिकारी यांच्याकडून एकमेकांवर जबाबदारी ढकलण्याचा प्रकार सुरू होता. अनेक वेळा ग्रामस्थ व सामाजिक कार्यकर्त्यांनी लेखी तक्रारी केल्या, मात्र कुठलीही ठोस कारवाई झाली नाही. १४ ऑक्टोबर २०२५ रोजी झालेल्या सुनावणीवेळी, माननीय न्यायमूर्ती श्रीमती विभा कंकणवाडी व हितेन व्हेनेगावकर यांच्या खंडपीठासमोर अॅड. नरसिंह जाधव यांनी सांगितले की, सर्वोच्च न्यायालयाच्या 'जगपाल सिंग विरुद्ध पंजाब सरकार' या निर्णयानुसार गायरान जमिनीवरील अतिक्रमण निष्कासित करण्याची जबाबदारी जिल्हाधिकाऱ्यांवर आहे. शासनाने त्यानुसार शासन निर्णय देखील जारी केला आहे. यावर विचार करत, न्यायालयाने स्पष्ट निर्देश दिले की, जिल्हाधिकारी बीड यांनी २७ मार्च २०२५ रोजी दाखल तक्रारीवर सहा महिन्यांत निर्णय घ्यावा. संपूर्ण जमिनीची मोजणी करून हद्द निश्चित करावी. या आदेशामुळे राजकीय हस्तक्षेपामुळे दबल्या गेलेल्या प्रकरणाला चालना मिळाली असून, नागरिकांनी जिल्हा प्रशासनाकडून पारदर्शक मोजणी, कारवाई व दोषींवर जबाबदारी निश्चित करण्याची मागणी केली आहे.याचिकाकर्त्यांचे काम अॅड. नरसिंह एल. जाधव यांनी पाहिले असून, त्यांना अॅड. गौरव खांडे यांनी सहकार्य केले. सरकार पक्षातर्फे अॅड. ए.आर. काळे यांनी काम पाहिले.

--------

### पंकजा मुंडे यांनी अनाथ मुलांसोबत

मुंडे यांनी एका आगळ्यावेगळ्या आणि हृदयस्पर्शी कार्यक्रमात अनाथ मुलांसोबत दिवाळी साजरी केली. या मुलांच्या चेहऱ्यावरील आनंद पाहून ना. पंकजाताई भावूक झाल्या. केंद्र शासनाच्या सांस्कृतिक मंत्रालय आणि द चिल्ड्रन्स एड सोसायटी फॉर अंडरप्रिव्हिलेज्ड किड्स ऑर्फनेजच्या यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय आधुनिक कला दालन, मुंबई येथे आयोजित कार्यक्रमास पंकजाताई मुंडे यांनी भेट दिली. या वेळी आकाश कंदील बनविण्याच्या कार्यशाळेचे आणि प्रसिद्ध कलाकार ए. ए. अल्मेलकर यांच्या कलाकृतीच्या प्रदर्शनाचे उद्घाटन त्यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी आधुनिक कला संग्रहालयाच्या संचालक निधी चौधरी उपस्थित होत्या. यावेळी पंकजाताई मुंडे म्हणाल्या, ही अनाथ मुलं कोणत्या जातीची, धर्माची आहेत हे महत्त्वाचे नाही, तर ती माणसाची आहेत आणि त्यांच्या डोळ्यांतील आनंद हा समाजासाठी प्रेरणादायी आहे. असा समाज घडला पाहिजे, जिथे प्रत्येक माणूस स्वतःची ओळख स्वतः निर्माण करेल. प्रदूषणमुक्त दिवाळीसाठी पर्यावरण विभागाने समाज माध्यमांद्वारे जनजागृती केली आहे, असे सांगून सर्व नागरिकांनी प्रदूषणमुक्त आणि पर्यावरणपूरक दिवाळी साजरी करण्याचे आवाहनही त्यांनी यावेळी केले. आपण ध्वनी आणि वायू प्रदूषण टाळून, निसर्गाशी सुसंगत अशी पर्यावरण पूरक दिवाळी साजरी करू, असे त्या म्हणाल्या. यावेळी पंकजाताई मुंडे यांनी मुलांसोबत आकाशकंदील तयार केले. तसेच पणत्या रंगवल्या आणि चित्रकला उपक्रमात सहभागही घेतला. छोट्या हातांनी केलेल्या सृजनातून व्यक्त झालेला उत्साह आणि निरागसतेचा झरा पाहून त्या भावूक झाल्या.

-----------

### धनगर एसटी आरक्षणासाठी मांजसुबा

घरी गुलामी करावी लागणार या नैराश्येतून आनंद न्यायमूर्ती कोकाटे रा.मांजरसुंबा ता.जि.बीड. येथील युवकाने आत्महत्या केली. त्यांच्या पश्चात आई, पत्नी, दोन मुली, एक मुलगा असा परिवार आहे.

--------

### युती पक्की, ठाकरे उडवतील ठिकऱ्या

चळवळीचा तो पक्ष आहे. तो अजूनही तसाचं आहे, असे म्हणत मराठी मतदाराची पीछेहाट करण्यासाठी मतदार याद्यामध्ये भाजपने घोळ घातला आहे, असा आरोपही त्यांनी केला. ते पुढे म्हणाले, भाजपचा रंग भ्रष्टाचारचा आहे. कारण काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसमधील सर्व भ्रष्ट नेते आता भाजपमध्ये आहेत. राज ठाकरे यांच्याकडे चहा प्यायला जाऊ नका आणि नाटक करू नका, अशी बोचरी टीकाही त्यांनी यावेळी केली.

-------------

### तर भुजबळांनी मंत्रिमंडळाच्या

झाल्याचे पाहायला मिळाले. राज्य सरकारमधील मंत्री छगन भुजबळ यांनी थेट नाव घेत महायुतीमधील भाजप नेते आणि मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्यावर निशाणा साधला. त्यामुळे, राजकीय वर्तुळात या टीकेचे, मंत्रिमंडळातील सहकारी यांच्यात याचे पडसाद उमटू लागले आहेत. त्यावरुन उद्धव ठाकरे शिवसेनेचे अंबादास दानवे यांनी भूजबळ यांचा चांगलेच सुनावले आहे. ते म्हणाले, तुमचा जर मंत्रिमंडळाच्या निर्णयाला विरोध आहे, तर मग मंत्रिमंडळात का रहता? मंत्रिमंडळात राहून मंत्र्यांच्या निर्णयाला विरोध म्हणजे हा दुपट्टीपणा आहे. नेतृत्व करणाऱ्या लोकांचा एक राजकीय बुरखा समोर आला आहे, अशा शब्दात अंबादास दानवे यांनी नाव न घेता छगन भुजबळ यांच्या भूमिकेवर निशाणा साधला. तसेच, राजीनामा देण्यासंदर्भात त्यांना सूचवले आहे. छगन भुजबळ यांना राज्याच्या मंत्रिमंडळ निर्णयाचा तिटकारा आहे, तर मंत्रिमंडळात गेले नाही पाहिजे, तिकडे ढुंकूनही नाही पाहिले पाहिजे. यामागे राज्य सरकार तर खेळ करत नाही का? असा प्रश्नही दानवे यांनी उपस्थित केला आहे.

--------------

### काँग्रेसचे २० ऑक्टोबरला

सोमवार दिनांक २० ऑक्टोबर रोजी राज्यभर शेतकऱ्यांसोबत पिठलं, भाकरी व ठेचा खाऊन आंदोलन करणार असल्याची घोषणा प्रदेश काँग्रेसने केली आहे.

cmyk

## कैं.तुकाराम गुरूजी गोधाम मध्ये वसुबारस साजरी

बीड : आज गोवत्स द्वादशी वसुबारस निमित्ताने कैं.तुकाराम गुरुजी गोधाम प्रकल्प शिवदरा पालवण येथे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के, जिल्हा परिषद उपाध्यक्षा सौ.जयश्रीताई मस्के यांनी सहकुटुंब पारंपरिक पद्धतीने पुजन करून गोमातेचेच्या प्रती कृतज्ञता व्यक्त करत वसुबारस सण साजरा केला. दीपावली पर्वाचा प्रारंभ वसुबारस सणापासून सुरू होतो. खऱ्या अर्थाने वसुबारस सण म्हणजे मातृत्व, संवेदनशीलता आणि कृतज्ञतेचा हा सण! आधुनिक काळातही हा सण आपल्याला स्मरण करून देतो की, शेती, निसर्ग आणि जनावरांशी आपले नाते हे केवळ उपजीविकेचे नाही, तर संस्कृतीचे आहे.हिंदू धर्मात गाय ही आईच्या दर्जाची पूजनीय तर असुन संस्कृतीचे प्रतीक आहे. अनेक कुटुंबांसाठी उपजीविकेचे साधन आहे.

दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
रविवार दि.१९ ऑक्टोबर २०२५



# गडकिल्ल्यांसाठी स्वतंत्र वैधानिक महामंडळ स्थापन करा

## बीडचे खा.बजरंग सोनवणे यांचे मुख्यमंत्री फडणविस यांना पत्र



बीड । प्रतिनिधी

महाराष्ट्र हे गड-किल्ल्यांचे राज्य म्हणून ओळखले जाते. छत्रपती शिवाजी महाराजांच्या अदम्य पराक्रमाचे, मराठा साम्राज्याच्या वैभवाचे आणि आपल्या समृद्ध सांस्कृतिक वारशाचे हे गड-किल्ले जिवंत प्रतीक आहेत. तथापि, आज या अनेक ऐतिहासिक दुर्गाची स्थिती अतिशय दयनीय असून, दुर्लक्ष, हवामानातील बदल, अनियंत्रित पर्यटन आणि देखभाल अभावी त्यांचे अस्तित्व धोक्यात आले आहे. यामुळे राज्यातील ऐतिहासिक व पौराणिक गड-किल्ल्यांचे संरक्षण, संवर्धन व पुनर्वभवासाठी स्वतंत्र वैधानिक महामंडळ स्थापन करावे, अशा मागणीचे पत्र बीडचे खा.बजरंग सोनवणे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणविस यांना दिले आहे. मुख्यमंत्री फडणविस यांना दिलेल्या पत्रात म्हटले आहे, राज्याच्या विविध विभागांद्वारे गड-किल्ल्यांचे संरक्षण व संवर्धनाची कामे सध्या होत असली, तरी ती तुकड्या-तुकड्यांनी आणि मर्यादित अधिकार व निधीच्या अभावामुळे प्रभावी ठरत नाहीत. या पार्श्वभूमीवर राज्य शासनाने महाराष्ट्र गड-किल्ले संवर्धन व विकास महामंडळ या नावाने वैधानिक अधिकार असलेले स्वतंत्र महामंडळ स्थापन करणे अत्यावश्यक ठरते.

या महामंडळाला राज्यातील सर्व ऐतिहासिक व पौराणिक गड-किल्ल्यांचे सर्वेक्षण, वर्गीकरण व संवर्धन आराखडा तयार करणे, प्रत्येक गडासाठी ऐतिहासिक व वास्तुशास्त्रीयदृष्ट्या योग्य अशा पुनर्वैभव आराखड्याची अंमलबजावणी, गडांच्या परिसरातील भूमी, बांधकामे, प्रवेशमार्ग, पाणीपुरवठा, स्वच्छता व सुरक्षा या सुविधा विकसित करणे, स्थानिक स्वयंसेवी संस्था, इतिहास अभ्यासक, पर्यटन व सांस्कृतिक विभाग यांच्यात समन्वय साधून दीर्घकालीन जतन योजना राबविणे, वार्षिक अर्थसंकल्पात या महामंडळासाठी स्वतंत्र निधी तरतूद करणे इत्यादी जबाबदारी व अधिकार देण्यात यावेत. राज्याच्या अस्मितेचा आणि पर्यटन विकासाचा केंद्रबिंदू असलेल्या या गड-किल्ल्यांना पुन्हा पूर्ववैभव प्राप्त व्हावे, हे महाराष्ट्राच्या प्रत्येक नागरिकाचे स्वप्न आहे. ते साकार करण्यासाठी स्वतंत्र महामंडळाची स्थापना ही काळाची गरज आहे. गांभीर्याने विचार करून, लवकरात लवकर अशा महामंडळाच्या स्थापनेचा निर्णय घ्यावा, असेही म्हटले आहे. खा.बजरंगे सोनवणे हे बीड जिल्ह्यातील विविध विकास कामांच्या बाबतीत आवाज उठवित आहेत. काल किल्ले धारूर दौ-यावर असताना त्यांनी धारुर येथील ऐतिहासिक किल्ल्याची पाहणी केली. महाराष्ट्राचे वैभव असलेल्या गडकिल्ल्यांबाबत सरंक्षण, संवर्धन व पुनर्वैभवासाठी सरकारदरबारी मांडणी करत आहेत.

## पंचायत समितीला कुलूप ठोकण्याचा इशारा देताच महिलांसाठीचे स्वच्छतागृह सुरु




बीड । प्रतिनिधी

बीड पंचायत समिती कार्यालयातील महिला कर्मचाऱ्यांसह कार्यालयात येणाऱ्या महिला अभ्यागतांसाठी असलेले स्वच्छतागृह पाणीटंचाईमुळे गेल्या अनेक दिवसांपासून कुलूपबंद अवस्थेत होते. प्रवेशद्वारावर ''बाहेरील शौचालय वापरावे'' अशी नोटीस लावण्यात आली होती, जी महिलांसाठी अत्यंत गैरसोयीची आणि असुरक्षिततेची बाब ठरली होती.

सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ, महाराष्ट्र राज्य डॉ. गणेश ढवळे (लिंबागणेशकर) यांनी दि.१७ रोजी पालकमंत्री अजितदादा पवार तसेच वरिष्ठ प्रशासनाला लेखी निवेदन देऊन या संदर्भात तीव्र निषेध नोंदविला. त्यांनी म्हटले होते की, ग्रामीण भागातून येणाऱ्या महिलांना बाहेर शौचालय शोधणे ही केवळ गैरसोय नव्हे, तर सुरक्षिततेच्या दृष्टीने चिंताजनक बाब आहे. तसेच ही घटना ''स्वच्छ भारत मिशन'' योजनेला हरताळ फासणारी असल्याचा आरोप करत दि.२० ऑक्टोबर रोजी पंचायत समितीला कुलूप ठोकण्याचा इशारा दिला होता. याची तात्काळ दखल घेत गटविकास अधिकारी श्री. अशोक राठोड यांनी स्पष्ट केले की, संबंधित स्वच्छतागृह दुरुस्तीच्या कामामुळे तात्पुरते बंद करण्यात आले होते. पहिल्या मजल्यावरील स्वच्छतागृहाचे काम पूर्ण करून ते पुन्हा सुरू करण्यात आले आहे. तसेच ''फक्त पुरुषांसाठी'' अशी नोटीस अनवधानाने न काढल्याची कबुली देत ती हटविण्यात आली असल्याचेही त्यांनी लेखी पत्रकाद्वारे डॉ. ढवळे यांना कळविले आहे. यानंतर महिलांसाठीचे स्वच्छतागृह पुन्हा खुले करण्यात आल्याने महिला कर्मचाऱ्यांसह अभ्यागतांमध्ये समाधान व्यक्त होत आहे. त्यामुळे सोमवार, दि.२० रोजी होणारे ''पंचायत समितीला कुलूप ठोका आंदोलन'' स्थगित करण्यात आले आहे.

## सहारा बालग्राम मधील विद्यार्थ्यांना नवीन कपडे व दिवाळी फराळ भेट



माजलगाव । प्रतिनिधी

दिवाळीच्या पार्श्वभूमीवर माजलगाव येथील फ्लाईंग बड्र्स अकॅडमीचे संस्थाचालक, शिक्षक आणि विद्यार्थ्यांनी सामाजिक बांधिलकीचे दर्शन घडवत गोविंदवाडी (ता. गेवराई, जि. बीड) येथील आई संस्थेच्या सहारा अनाथालय परिवार बालग्रामला सदिच्छा भेट दिली. यावेळी अनाथ मुलांसाठी कपडे आणि दिवाळी फराळ देऊन त्यांच्या चेहऱ्यावर आनंदाचे क्षण फुलवले. फ्लाईंग बड्र्स अकॅडमीचे संस्थाचालक पांडुरंग चांडक मुख्याध्यापिका सारिका बजाज, सौ.ऐश्वर्या चांडक,श्री.रमेश बाहेती, उपमुख्याध्यापिका सौ.ज्योती बनसोडे यांच्या समवेत इयत्ता नववीचे विद्यार्थी आणि सर्व शिक्षक वृंदानी अनाथालयाचे संचालक प्रीती व संतोष गर्जे यांच्याकडे ही मदत सुपूर्द केली.

यावेळी अनाथालयाचे संतोष गर्जे यांनी मनोगत व्यक्त करताना अकॅडमीच्या सदस्यांना भावनिक साद घातली. ते म्हणाले, ''या मुलांना मोठे करताना आम्हाला तुमचा एक हात लागणार आहे. भविष्याचे स्वप्न दाखवताना तुमच्या पाऊलखुणा दाखवणार आहोत. यांना सुजाण नागरिक घडवताना आम्ही तुमचाच आदर्श पुढे ठेवणार आहोत. त्यामुळे या प्रवासात अनाथ लेकरांच्या जीवनाला आकार देण्यासाठी आम्हाला आपली साथ हवी आहे. जें यांच्या या मनोगताने उपस्थितांचे डोळे पाणावले. सर्व शिक्षकांच्या एका डोळ्यामध्ये आसू तर एका डोळ्यात हसू होते, असे भावनिक वातावरण यावेळी तयार झाले होते. मामाचे गाव समजून माजलगावला या संस्थाचालक पांडुरंग चांडक यांनी यावेळी विद्यार्थ्यांना एक अत्यंत आपुलकीची विनंती केली. त्यांनी अनाथालयाच्या मुलांना फ्लाईंग बड्र्स माजलगाव च्या प्ले झोनला तसेच माजलगाव परिसरातील प्रेक्षणीय स्थळी घेऊन येण्याचे निमंत्रण दिले. ''या मुलांना कोणत्याही गावी जाता येत नाही, तेव्हा तुम्ही माजलगावला 'मामाचे गाव' समजून आमच्याकडे या.आम्ही तुमचे यथा योग्य स्वागत करू,'' तुमचा आनंद द्विगुणित करू असे चांडक यांनी सांगितले यावेळी मुख्याध्यापिका सौ. सारिका बजाज मॅडम यांनी दरवर्षी दिवाळीचे आनंदाचे क्षण साजरा करण्यासाठी अनाथालयास नक्की येऊ, असा निश्चय व्यक्त केला. उपमुख्याध्यापिका सौ. ज्योती बनसोडे यांनी प्रीती व संतोष गर्जे यांच्या आई-वडिलांसारख्या प्रेमामुळे मुलं आनंदात नांदत असल्याबद्दल त्यांचे कौतुक केले आणि त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. फ्लाईंग बड्र्स अकॅडमीच्या सर्व शिक्षकांनी यावर्षीची दिवाळी एका सामाजिक बांधिलकी समजून नवीन उपक्रमाने साजरी केली.

## भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या वतीने बीड तालुक्यातील विविध गावात पुरग्रस्ताना मदतीचा हात

### काँग्रेस का हाथ किसनो के साथ-गणेश बजगुडे



बीड । प्रतिनिधी

मागील काही दिवसांपुर्वी झालेल्या अतिवृष्टीमुळे जगाचा पोशिंदा असलेला बळीराजा अतिशय हवालदिल झाला होता. सणासुदीच्या तोंडावर हातातोंडाला आलेले खरिपाचे पीक निस्तनाबुत झालेले असताना पीक तर गेलेच परंतु जमिनी देखील वाहुन गेलेल्या आहेत. आशा परिस्थितीत मायबाप सरकार मात्र शेतकऱ्यांना मदत नकरता त्यांच्यावर ओढवलेल्या आपत्तीचे राजकारण करण्यात व्यस्त होते. ओला दुष्काळ जाहीर करुन सरसकट हेक्टरी पन्नास हजार रुपये मदतीची मागणी सर्व स्तरावर असताना देखील कुठलीही ठोस मदत तत्काळ शेतकऱ्यांना मिळाली नाही. पंचनाम्याच्या नावावर वेळमारुन नेण्याचे काम या सरकारने केलेले असुन अतिशय तुटपुंज्या मदतीची घोषणा सरकार करत आहे. अशा वेळी काँग्रेस मात्र शेतकऱ्यांच्या बांधावर जावुन प्रत्यक्ष मदत करत त्यांना आधार देण्याचे काम करत आहे. बीड तालुक्यातील अनेक गावाना माजी मंत्री अशोकराव पाटील, लातुरचे खासदार डॉ. शिवाजी काळगे, जिल्हाध्यक्ष राहुल सोनवणे, तालुकाध्यक्ष गणेश बजगुडे पाटील यांच्यासह काँग्रेसच्या शिष्टमंडळांनी नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना भेटी देत संकटसमयी काँग्रेस पाठीशी असल्याचे सांगितले. फक्त भेटी देवुन न थांबता नुकसानग्रस्त कुटुंबियांना मदतीचा हात देत जीवनावशक वस्तुचे वाटप खासदार रजनीताई पाटील परिवाराच्या वतीने युवा नेते आदित्य पाटील, जिल्हाध्यक्ष राहुल सोनवणे, तालुकाध्यक्ष गणेश बजगुडे पाटील यांच्या माध्यमातुन करण्यात आले. यावेळी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष गणेश बजगुडे पाटील म्हणाले की, काँग्रेस का हाथ किसानो के साथ असुन शेतकरी, कष्टकरी, कामगार वर्गाच्या पाठीशी काँग्रेस खंबीरपणे उभा आहे. अडचणीत मदत करणे हे आमचे कर्तव्य आहे त्याच बरोबर शेतकरी कष्टकरी वर्गाच्या न्याय हक्कासाठी या भारतीय जनता पक्षाच्या जुलमी सरकारच्या विरोधात मोठा लढा देखील उभारणार असल्याचे बजगुडे पाटील यांनी सांगितले यावेळी बलभीम बोरवडे, विनोद पाटील, शेख कादर बाबामिया, श्रीमंत घोडके, भैय्या गोरे, ओंकार नवले आदी पदाधिकारी उपस्थित होते.

## आष्टी नागरी सहकारी पतसंस्थेकडून सभासदांना ३४ लाख रुपयांचा लाभांश वाटप



आष्टी। प्रतिनिधी

संपूर्ण मराठवाड्यातील सहकार क्षेत्रात नामांकित असलेल्या आष्टी नागरी सहकारी पतसंस्था मर्यादितच्या वतीने यावर्षीही सभासदांना ८ टक्के प्रमाणे एकूण ३४ लाख रुपयांचा लाभांश जाहीर करण्यात आला. या लाभांशाचे वाटपाची सुरुवात बुधवार, १५ ऑक्टोबर २०२५ रोजी सकाळी ११ वाजता संस्थेचे अध्यक्ष डॉ. विलास सोनवणे यांच्या शुभहस्ते करण्यात आली.

लाभांश वाटप कार्यक्रमाला संस्थेचे उपाध्यक्ष नवनीत कटारिया, संचालक अश्पाक शेठ, जयचंदजी चोपडा, बन बुवा, संस्थेचे सचिव काकासाहेब पोकळे, डॉ. मधुकर हंबर्डे, सहव्यवस्थापक आनंद शेलार तसेच संस्थेचे कर्मचारी व मोठ्या संख्येने सभासद उपस्थित होते. संस्थेचे यावेळी, अध्यक्ष डॉ. विलास सोनवणे यांनी सर्व सभासदांना लाभांशाच्या शुभेच्छा देत, प्रत्येक सभासदाने आपला लाभांश लवकरात लवकर घेऊन जावे, असे आवाहन केले. संस्थेच्या सर्वांगीण विकासासाठी सभासदांचे सहकार्य आणि विश्वास अखंडित राहावा, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

## ज्यांच्या विरोधात तक्रार तेच आले चौकशीला ;

# माजलगाव पं.स.चा अजब कारभार

**बडेवाडी येथील घरकुल प्रकरण**



तेलगाव। प्रतिनिधी

नित्रुड ग्राम पंचायत अंतर्गत असलेल्या बडेवाडी येथील घरकुल प्रकरणात ज्यांच्या विरोधात तक्रार केली तेच कर्मचारी गावात घरकुल प्रकरणाची चौकशी करायला आल्याचा अजब प्रकार बडेवाडी येथे घडल्याने याप्रकरणाची माजलगाव तालुक्यात जोरदार चर्चा असुन, हा प्रकार म्हणजे केवळ दिशाभूल करण्याचा असुन, भ्रष्टाचाऱ्यास पाठीशी घालण्याचा असल्याच्या संतप्त प्रतिक्रिया नागरिक उपस्थित करत असुन, घरकुल प्रकरणातील दोषी कडक कारवाई करून, या चौकशी पथकात आलेल्यांची सखोल चौकशी करावी.अन्यथा यासाठी लोकशाही मार्गाने आंदोलन करण्यात येईल. असा इशारा तक्रारदाराच्या वतीने दिला आहे.

यासंदर्भात माहिती अशी की,तेलगाव पासुन जवळच असलेल्या नित्रुड ग्राम पंचायत अंतर्गत येत असलेल्या बडेवाडी ता.माजलगाव येथे घरकुल योजनेत झालेल्या भ्रष्टाचाराची गावतील तरूण संतोष बडे याने माजलगाव पंचायत समिती कार्यालयात रितसर तक्रार अर्ज देऊन, याप्रकरणातील ग्रामरोजगार सेवक, घरकुल योजनेचे ऑपरेटर, संबंधित इंजिनिअर आदिसह इतरांवर कडक कारवाई करण्याची मागणी केली होती.त्यावरून पंचायत समितीने या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी चौकशी पथक बडेवाडी येथे पाठवले.मात्र तक्रारदार संतोष बडे यांनी ज्यांच्या विरोधात तक्रार केली त्याच कर्मचाऱ्यांना चौकशीसाठी पाठवल्याने दिलेल्या तक्रारीचे निरसन काय होणार, दोषींवर काय कारवाई होणार व कोण करणार. हा प्रकार म्हणजे भ्रष्टाचाऱ्यास पाठीशी घालण्याचा असल्याच्या संतप्त प्रतिक्रिया बडेवाडी ग्रामस्थांसह माजलगाव तालुक्यातील नागरिक व्यक्त करत आहेत.

## आरोग्य कंत्राटी कर्मचाऱ्यांना न्याय द्यावा अन्यथा जनता निवडणुकीत उत्तर देईल :सरपते

बीड,प्रतिनिधी-

बीड जिल्ह्यातील विविध प्राथमिक आरोग्य केंद्रांवर कार्यरत कंत्राटी कर्मचारी मागील दोन महिन्यांपासून (ऑगस्ट व सप्टेंबर २०२५) पगाराशिवाय काम करत आहेत.

दिवाळीसारखा सण अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपलेला असतानाही अद्याप या कर्मचाऱ्यांना वेतन मिळालेले नाही, ही गोष्ट अत्यंत लाजीरवाणी व अन्यायकारक आहे, असे मत वंचित बहुजन आघाडीचे बीड शहर सदस्य मिलिंद सरपते यांनी व्यक्त केले.

क्र.२०२५/संकीर्ण/जन्म-मृत्यु नोंदणी/कावि
कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसीलदारअंबाजोगाई
दि.१७/१०/२०२५

**जाहिरनामा**

**जन्म मृत्यु नोंदणी प्रमाणपत्र मिळणेबाबत जन्म आणि मृत्युची नोंदणी (सुधारणा) कायदा २०२३ ० मधील कलम ११ अन्वये**

सर्व जनतेस तालुका अंबाजोगाई यांना जाहिर केले जाते की, अर्जदार वसीम करीम कुरेशी रा.घाटनांदूर ता. अंबाजोगाई यांचा जन्म दिनांक ०२.०२.१९९३ रोजी राहत्या घरी मौजे घाटनांदूर ता. अंबाजोगाई येथे झाला असून अर्जदारांनी जन्म नोंद कायदेशीर असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळावे म्हणुन या कार्यालयात अर्ज दाखल केला आहे.

करिता अर्जदाराचे यांचे कायदेशीर जन्माची दिनांक कायदेशीर नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर ह्या जाहिरनाम्याचे प्रसिध्दी तारखेपासून १५ दिवसाच्या आत त्याने ह्या कार्यालयात हजर राहुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरच असे कळविण्यात येते की जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखवल्या तर सदर कार्यालय सदरहु अर्जदार ह्यांच्या हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत झाल्यास त्यांना सदरहु अर्जदारांचे जन्म नोंद कायदेशीर असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

स्वाक्षरित
कार्यकारी दंडाधिकारी तथा
तहसीलदार अंबाजोगाई

**जाहीर प्रगटन**

**दिवाणी न्यायालय, घनसावंगी येथील श्री सी. एस. जगताप, दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, घनसावंगी यांचे न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज क्र. १७९/२०२५**

**सुमय्या व इतर - वि.- निरंक**

अर्जदारः १. सुमय्या भ्र. अमजत पठाण, वय ३२ वर्ष, धंदा घरकाम, २. आलिया पि. अमजत पठाण, वय १३ वर्ष, धंदा शिक्षण, ३. सानिया पि. अमजत पठाण वय १२ वर्ष, धंदा शिक्षण, ४. अश्मिरा पि. अमजत पठाण, वय १० वर्ष, धंदा शिक्षण, ५. जारा पि. अमजत पठाण, वय ०७ वर्ष, धंदा शिक्षण, ६. रिदा पि. अमजत पठाण, वय ०५ वर्ष, धंदा निरंक

अर्जदार क्र. २ ते ६ यांची अ.पा.क. अर्जदार क्र.१ सख्खी मातोश्री या नात्याने सर्व रा. बाजार चौक, घनसावंगी ता. घनसावंगी जि. जालना

विरुध्द - निरंक

अर्ज - कलम २ व ७ बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळणेबाबत. अर्जदार यांनी ॲड.एस.ए. शेख यांच्या मार्फत या न्यायालयात असा अर्ज केला की, अर्जदार क्र.१ यांचे पती तसेच अर्जदार क्र.२ ते ६ चे वडील अमजतखा पि. राजेखा पठाण यांचा मृत्यू दिनांक १६/०८/२०२५ रोजी मौजे राहेरा ता. घनसावंगी जि. जालना येथे झाला आहे.

हे की, मयत अमजतखा पि. राजेखा पठाण यांना अर्जदारांशिवाय ईतर अन्य कुठलेही कायदेशीर वारस नाहीत. अर्जदारास शासकीय व निमशासकीय कामकाजासाठी मयताचे वारस म्हणून वारस प्रमाणपत्राची नितांत आवश्यकता आहे. करीता, या जाहीर प्रगटनांद्वारे सर्वत्र कळविण्यात येते की, या बाबत जर कोणास काहीएक आक्षेप असेल तर त्यांनी सदरचे प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात आपला आक्षेप सादर करावा. जर नमूद केलेल्या काळात कोणाचाही आक्षेप आला नाही, तर संबंधित प्रकरणात कायद्याप्रमाणे योग्य ती कार्यवाही केली जाईल, याची नोंद घ्यावी. सदर प्रकरणात पुढील तारीख १९/११/२०२५ ठेवण्यात आली आहे.

आज दिनांक १७/१०/२०२५ रोजी माझ्या सहीनिशी व या न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले आहे.

स्वाक्षरित
**के लिपीक**
(एस.एस. देशमुख)

आदेशान्वये
स्वाक्षरित
**प्र. सहायक अधिक्षक दिवाणी**
न्यायालय क. स्तर, घनसावंगी

cmyk

# गोकुळकडून म्हैस, गायीच्या दूध खरेदी दरात १ रुपयाने वाढ

## पशुखाद्य दरात ५० रुपयांची कपात

कोल्हापूर : डिबेंचर कपातीला दूध संस्था आणि दूध उत्पादकांकडून जोरदार विरोध सुरु असतानाच कोल्हापूर जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघाने (गोकुळ) दिवाळीत दूध उत्पादकांना खुश करण्यासाठी महत्त्वाचे निर्णय घेतले. गोकुळने कोल्हापूर जिल्ह्यातील आणि जिल्ह्याबाहेरील गाय आणि म्हैशीच्या दूध खरेदी दरामध्ये प्रतिलिटर १ रुपयाची वाढ केली आहे. यामुळे म्हैस दूध दर प्रतिलिटर ५१.५० रुपयांवरून ५२.५० रुपये आणि गाय दूध दर ३३ रुपयांवरून ३४ रुपये करण्यात आला आहे. २१ ऑक्टोबरपासून हे खरेदी दर लागू होतील. या निर्णयाचा साडेचार लाख दूध उत्पादकांना फायदा होणार आहे. तसेच 'महालक्ष्मी गोल्ड' आणि 'कोहिनूर डायमंड' या पशुखाद्यांच्या मूळ विक्री दरात ५० किलोच्या पोत्यावर ५० रुपये सवलत देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.


मार्च २०२६ अखेरपर्यंत या योजनेतून दूध उत्पादकांना ५.५ कोटींचा लाभ मिळेल. तसेच संस्था व्यवस्थापन खर्च ९० पैशांऐवजी १ रुपये (१० पैशांची वाढ) करण्यात आला आहे. यामुळे ६ कोटींचा वार्षिक भार संघावर पडेल. याचसोबत गाभण जनावरांसाठी नवीन 'महालक्ष्मी प्रेग्नन्सी रेशन' बाजारात आणण्यात आले आहे. यामुळे प्रसूती सुलभ होते. रेडके/वासरे निरोगी जन्माला येतात आणि दूध उत्पादनात वाढ होण्यास मदत होणार असल्याने गोकुळने म्हटले आहे. गोकुळ संघाने दूध उत्पादन वाढीस प्रोत्साहन मिळावे म्हणून दूध खरेदी दरात वाढ करण्याचा निर्णय घेतला आहे. २१ ऑक्टोबरपासून जिल्ह्यात म्हैस दूध खरेदी ६.० फॅट आणि ९.० एस. एन.एफ करिता प्रतिलिटर ५१.५० रुपयांवरून ५२.५० रुपये दराने करण्यात येईल. तर गाय दूध खरेदी ३.५ फॅट आणि ८.५ एस. एन. एफ करिता प्रतिलिटर ३३ रुपयांवरून ३४ रुपये दराने करण्यात येईल, असे गोकुळने म्हटले आहे.



दूध विक्री दरात वाढ नाही

या दरवाढीमुळे म्हैस आणि गाय दूध उत्पादक शेतकऱ्यांना महिन्याकाठी सुमारे साडेचार ते पाच कोटी अधिक रक्कम मिळेल. दरम्यान, गोकुळ दूध विक्री दरात कोणतीही वाढ करण्यात आली नसल्याचे संघाकडून स्पष्ट करण्यात आले आहे. गोकुळ दूध संघासाठी कोल्हापूर जिल्हा आणि जिल्ह्याबाहेरील ७ हजार ५०० प्राथमिक दूध संस्थांच्या माध्यमातून दररोज सुमारे १६ लाख लिटर दूध संकलन केले जाते. दूध उत्पादकांच्या प्रगतीसाठी आणि दूध व्यवसाय वाढीसाठी आम्ही सदैव तत्पर असल्याचे गोकुळचे अध्यक्ष नविद मुश्रीफ यांनी म्हटले आहे.

## या आहेत आल्याच्या पाच सर्वोत्तम जाती; होईल भरघोस उत्पादन!






राज्यातील शेतकरी सध्या मोठ्या प्रमाणात आले शेतीकडे वळत असून, राज्याच्या सर्व भागांत आल्याची कमी-अधिक प्रमाणात लागवड आढळून येत आहे. बाजारात बाराही महिने मागणी असल्याने, आले लागवड करण्यास शेतकऱ्यांचा कल वाढताना दिसत आहे. मात्र आता आपणही आपल्या शेतात आले लागवडीचा विचार करत असाल तर ही बातमी तुमच्यासाठी आहे. कोणत्याही पिकाची लागवड करताना पहिला प्रश्न पडतो तो वाण कोणते निवडावे? तर सुप्रभा, रीओ दी जेनेरिओ, सुरभी, मरान आणि अथिरा या आल्याच्या पाच प्रमुख प्रजाती आहेत. ज्यामुळे तुम्हाला मोठ्या प्रमाणात फायदा होऊ शकतो. औषधी गुणधर्मांमुळे आल्याच्या सेवनाने सर्दी, खोकला, पचनाचे आजार, मुतखडा, कावीळ यांसारख्या आजारांपासून आराम मिळतो. त्यामुळे त्याला कायम मागणी असल्यामुळे बाजारात चांगला भावही मिळतो. आले पिकाची लागवड ही एप्रिलपासून मे अखेरपर्यंत कधीही करू शकतो. नोव्हेंबर डिसेंबरपर्यंत पीक काढणीला येते.

सुप्रभा : ही जात कुंडली स्थानिक या जातीमधून निवडली गेली असून, तिला मोठ्या प्रमाणात फुटवे असतात. तिचे कंद जाड, चमकदार आणि करड्या रंगाचे असते. या जातीला काढणीसाठी सर्वसाधारणपणे २२५ ते २३० दिवसांचा कालावधी लागतो. या प्रजातीच्या माध्यमातून शेतकरी एकरी ८० ते ९० क्विंटल उत्पादन घेऊ शकतात. रीओ दी जेनेरिओ : आल्याच्या या जातीच्या लागवडीतून प्रति हेक्टर २०० ते २३० क्विंटल उत्पादन मिळते. या जातीचे कंद हे सफेद आणि चमकदार असतात. या जातीला प्रामुख्याने २२५ ते २३० दिवसांचा कालावधी लागतो. ही आल्याची रोगप्रतिकारक्षम जात मानली जाते. सुरभी : या जातीला भरपूर फुटवे असतात. तिचे कंद हे प्रामुख्याने आकर्षक असतात. या जातीला २२५ ते २३५ दिवसांचा कालावधी लागतो. ही जात राइझोम रॉट रोगास सहनशील आहे.

तसेच या जातीद्वारे एकरी ८० ते १०० क्विंटल उत्पादन मिळू शकते. मरान : या जातीचा रंग हलका सोनेरी असून, ती प्रामुख्याने २३० ते २४० दिवसांत काढणीला येते. या जातीची उत्पादन क्षमता १७५ ते २०० क्विंटल प्रति हेक्टर इतकी आहे. ही जात रोगप्रतिकारक्षम मानली जाते. अथिरा : या जातीला प्रामुख्याने २२० ते २४० दिवसांचा कालावधी लागतो. प्रति एकर ८४ ते ९२ क्विंटल उत्पादन या जातीच्या माध्यमातून मिळू शकते. ही आल्याची सर्वोत्तम जात मानली जाते.

## कोरफडीच्या शेतीसाठी या आहेत पाच प्रमुख प्रजाती!

सध्या आरोग्याबाबत लोक मोठ्या प्रमाणात जागरूक होत आहेत. कोरोना महामारीनंतर अनेकांनी आपल्या आरोग्यास प्राधान्य देण्यास सुरुवात केली आहे. त्यामुळे आयुर्वेदिक आणि रोगप्रतिकार शक्ती वाढवणाऱ्या वस्तूंची मागणी दिवसेंदिवस वाढत आहे. त्यातच आता कोरफड शेती शेतकऱ्यांसाठी फायद्याची शेती म्हणून पुढे येत आहे. सौंदर्य प्रसाधनांमध्ये आणि आयुर्वेदिक औषधांमध्ये कोरफडीचा मोठ्या प्रमाणात वापर होत असल्याने शेतकरी कोरफड लागवडीकडे वळत आहेत. कोरफड शेतीची एक विशेषतः म्हणजे एकदा लागवड केल्यानंतर तुम्हाला त्यातून वर्षानुवर्षे उत्पादन मिळू शकते. देशातील सर्व राज्यांमध्ये कोरफड शेती केली जाऊ जाते.



त्यामुळे कोरफडी शेती शेतकऱ्यांसाठी मोठ्या प्रमाणात फायद्याची ठरत आहे. त्यामुळे तुम्हीही कोरफड शेती करू इच्छित असाल तर त्यासाठी कोणत्या प्रमुख जाती आहेत. ज्या तुम्हाला चांगले उत्पन्न मिळवून देण्यात मदत करतील. तर यामध्ये टाइगर एलो, एलो डेस्कइंगसी, रेड एलो, एलो ब्रेविफोलिया आणि एलो एरिस्टाटा या कोरफडीच्या पाच प्रमुख जाती मानल्या जातात.

टाइगर एलो प्रजाती : सर्व प्रजातींमध्ये ही कोरफडीची सर्वात उत्तम प्रजाती मानली जाते. या प्रजातीला एखाद्या छोट्याशा कुंडीमध्ये देखील लावले जाऊ शकते. या जातीची शेती म्हणून लागवड केल्यास तुम्हाला यातून मोठ्या प्रमाणात उत्पन्न मिळू शकते. या जातीची पाने ही तलवारीच्या आकाराची असतात.

एलो डेस्कइंगसी प्रजाती : ही कोरफडीची सर्वात लहान जात मानली जाते. जिची उंची ही केवळ दोन ते तीन इंच इतकी असते. या जातीची गडद हिरव्या रंगाच्या पानांवर पांढरे ठिपके असतात. वसंत ऋतूमध्ये उन्हाळयाच्या दिवसांमध्ये या जातीच्या कोरफडीला पिवळे नारंगी फुले येतात.

रेड एलो प्रजाती : लाल कोरफड म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या कोरफडीमध्ये प्रतिजविकांचा गुणधर्म असतो. त्यामुळे मानवी शरीरासाठी ही जात सर्वात उत्तम मानली जाते. या जातीची वाढ संथ गतीने तसेच तिला अल्प प्रमाणात पाण्याची आवश्यकता असते. ही सर्वात आकर्षक जात म्हणून ओळखली जाते. सूर्य किरण पडताच ती लाल तांबूस रंगाची दिसते.

एलो ब्रेविफोलिया प्रजाती : ही कोरफडीची लहान पाने असलेली जात आहे. तिच्या भुरक्या रंगाच्या पानांवर कधीकधी नारंगी रंग दिसून येतो. ज्यामुळे हिवाळ्यात दिवसांमध्ये ही आकर्षक जात मानली जाते.

एलो एरिस्टाटा प्रजाती : कोरफडीची ही जात अन्य जातींपेक्षा खूपच वेगळी मानली जाते. कारण तिच्यामध्ये कडाक्याची थंडी सहन करण्याची क्षमता आहे. या प्रजातीला जास्त उन्हाची आवश्यकता नसते. ही प्रजाती आपल्या सफेद तुरे आणि ओबडधोबड पानांसाठी विशेष ओळखली जाते.

## चिया सीड लागवडीतून शेतकऱ्यांना दुप्पट उत्पन्नाची संधी!

चिया, किंवा मेक्सिकन चिया, हे भारतीय शेतकऱ्यांसाठी नवीन पीक असले तरी पोषक घटकांनी समृद्ध या बियाण्यांचे आहारातील महत्व यामुळे चिया बियाण्यांची लोकप्रियता वेगाने वाढत आहे. चिया लागवडीतून शेतकऱ्यांना खर्चापेक्षा दुप्पट उत्पन्न मिळू शकते. पोषक तत्वांनी समृद्ध, चिया पिकाला अत्यंत कमी देखभाल लागते. हे पीक रोग व किडीपासून मुक्त राहते, त्यामुळे चिया लागवड करणाऱ्या शेतकऱ्यांना नुकसानाची चिंता करण्याची गरज नाही. सध्या भारतात, मध्य प्रदेश, आंध्र प्रदेश, गुजरात, कर्नाटक, राजस्थान आणि हरियाणामध्ये या पिकाची शास्त्रोक्त पद्धतीने लागवड केली जात आहे. सेंद्रिय पद्धतीने या पिकाची लागवड करणे उत्पन्नाच्या दृष्टीने उत्तम असते.

चिया पिकाच्या लागवडीतील महत्वाचे मुद्दे : चिया हे पीक मध्यम सुपीक आणि चांगल्या निचऱ्याच्या जमिनीत सहज उगवते या पिकात आम्लीय माती मोठ्या प्रमाणात सहन करण्याची क्षमता आहे. परंतु अधिक क्षारयुक्त जमिनीत पिकाचे उत्पादन कमी होते. चांगल्या उत्पादनासाठी वालुकामय चिकणमाती माती सर्वात योग्य आहे. भारतात चिया पेरणीसाठी सर्वोत्तम काळ ५ ते २५ ऑक्टोबर पर्यंत आहे. पेरणीच्या वेळी, २५ ते ३० अंश सेल्सिअस तापमान बियांच्या चांगल्या उगवणासाठी सर्वात योग्य आहे. हे पीक थंडीसाठी अत्यंत संवेदनशील असले तरी, डिसेंबर आणि जानेवारी महिन्याची थंडी या पिकासाठी पोषक आहे. शेत तयार करण्यासाठी खोल नांगरणी व एक कुळवणी पुरेशी आहे. पेरणीसाठी चांगल्या प्रतिचे बियाणे वापरावे. प्रामुख्याने चिया बियाण्यांचे काळे आणि पांढरे असे दोन प्रकार आहेत. २.५ ते ३ किलोग्रॅम बियाणे प्रति एकर लागवडीसाठी पुरेसे आहेत. चियाची पेरणी सीड ड्रिल किंवा पेरणी यंत्राने करता येते. पेरणीच्या वेळी दोन ओळीतील अंतर ३० ते ४५ सें.मी. व रोपातील अंतर ३० सेमी अंतर ठेवावे. चिया पिकाचे योग्य पोषण होऊन चांगले उत्पादन मिळविण्यासाठी हेक्टरी १०-१५ टन चांगले कुजलेले शेणखत जमीन तयार करतांना द्यावे. हलक्या जमिनीत पेरणीच्या वेळी २०-३० किलो नत्र, २०-२५ किलो स्फुरद आणि १५-२० किलो पोटॅश प्रति हेक्टरी देणे झाडांच्या आवश्यक वाढीसाठी फायदेशीर ठरते. गरजेनुसार १० किलो नत्र प्रति हेक्टरी पेरणीनंतर ३०-४५ दिवसांनी द्यावे. बियाणे अंकुरित होण्याच्या काळात मातीत पुरेसा ओलावा असणे आवश्यक आहे. वालुकामय किंवा वालुकामय चिकणमाती जमिनीत पेरणी केल्यानंतर साधारणपणे ४-५ वेळा पाणी द्यावे लागते. परंतु चिया पीक पक्क होण्याच्या कालावधीत पिकाला पाणी देऊ नये. या पिकाला तणांचा आणि किडी व रोगांचा त्रास होत नाही तरी सुरुवातीला २५ ते ३० दिवस शेत तणमुक्त ठेवावे. चिया हे पीक थंडीसाठी जास्त संवेदनशील असल्यामुळे जास्त थंडीत जमिनीला हलके सिंचित करणे फायद्याचे ठरते. चिया पीक १२०-१३० दिवसांत काढणीसाठी तयार होते. यावेळी पिकाची सर्व पाने गळून पडतात. पिकाची काढणी हिवाळ्यातच, म्हणजे झाडे सुप्त अवस्थेत असतांना करावी. पिकाची कापणी विळ्याने किंवा मशीनने करता येते. त्यानंतर लाकडी काठीने मळणी करावी. चियाचे प्रति एकर सरासरी उत्पादन ३५०-४०० किलो बियाणे एवढे येते. शेतकऱ्यांना चिया पिकाच्या लागवडीतून भरघोस उत्पन्न मिळू शकते. गरज आहे फक्त या पिकाचे शास्त्रोक्त पद्धतीने लागवड करण्याची.






### महत्वाच्या घटना

१२१६ : इंग्लंडचा राजा जॉन मृत्यूमुखी पडल्यामुळे त्याचा ९ वर्षांचा मुलगा हेन्री हा राजेपदी आरुढ झाला.
१७८१ : ब्रिटिश जनरल कॉर्नवॉलिस अमेरिकेला शरण गेले, यामुळे अमेरिकन क्रांती युद्ध संपले.
१८१२ : नेपोलियन बोनापार्टने मॉस्कोच्या सीमेवरुन माघार घेतली.
१८५३ : अमेरिकतील हवाना येथे जगातील पहिली पिठाची गिरणी सुरु करण्यात आली.
१९३३ : जर्मनी लीग ऑफ नेशन्स मधून बाहेर पडले.
१९३५ : इथिओपियावर आक्रमण केल्यामुळे राष्ट्रसंघाने इटलीवर आर्थिक निर्बंध घातले.
१९४४ : दुसरे महायुद्ध अमेरिकन फौजा फिलीपाइन्सला पोचल्या.
१९७० : भारतीय बनावटीचे पहिले मिग लढाऊ विमान हवाईदलाकडे सुपुर्द
१९९३ : पुण्याजवळील महारेडिओ दुर्बिण प्रकल्पाचे जनक आणि शास्त्रज्ञ प्रा. गोविंद स्वरुप यांना सर सी. व्ही. रामन पदक जाहीर
१९९४ : रुद्रवीणावादक उस्ताद असद अली खाँ यांना मध्य प्रदेश सरकारचा 'तानसेन पुरस्कार' जाहीर.
२००० : पार्श्वगायिका आशा भोसले यांना राज्यशासनाचा गानसम्राज्ञी लता मंगेशकर पुरस्कार प्रदान
२००५ : मानवतेविरुद्ध गुन्ह्यांसाठी सद्दाम हुसेन यांच्याविरुद्ध खटला सुरू झाला.
२०१९ : सैनिकी शाळेत मुलींनाही प्रवेश मिळण्याच्या प्रस्तावाला स्वरक्षण मंत्री यांची मंजुरी मिळाली.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१९०२ : दिवाकर कृष्ण केळकर तथा दिवाकर कृष्ण कथालेखक. 'किशोरीचे हृदय', 'विद्या आणि वारुणी' ही कादंबरी, 'तोड ही माळ' हे नाटक व अनेक कथासंग्रह त्यांनी लिहीले. (मृत्यू: ३१ मे १९७३ हैदराबाद, आंध्र प्रदेश)
१९१० : सुब्रमण्यन चंद्रशेखर तार्यांचे आयुर्मान व त्यांचा शेवट यावरील संशोधनासाठी १९८३ मधे नोबेल पारितोषिक मिळालेले भारतीय- अमेरिकन खगोल वैज्ञानिक. त्यांनी आपल्या आयुष्यातील बराच काळ कृष्णविवरांवरील संशोधनासाठी खर्च केला. (मृत्यू: २१ ऑगस्ट १९९५)
१९२० : पांडुरंगशास्त्री आठवले कृतीशील विचारवंत आणि तत्त्वज्ञ. न्याय, वेदांत व्याकरण आदि शास्त्रांचा अभ्यास केल्यानंतर पौर्वात्य व पाश्चिमात्य तत्त्वज्ञानाचा त्यांनी तौलनिक अभ्यास केला. अवघ्या वीस सहकार्यांना बरोबर घेऊन त्यांनी 'स्वाध्याय परिवार' सुरू केला. त्यांचा जन्मदिन स्वाध्याय परिवारातर्फे 'मनुष्य गौरव दिन' म्हणून साजरा केला जातो. (मृत्यू: २५ आक्टोबर २००३)
१९२५ : डॉ. वामन दत्तात्रय तथा 'वा. द.' वर्तक वनस्पतीशास्त्रज्ञ व देवराई अभ्यासक (मृत्यू: १७ एप्रिल २००१)
१९२९ : पद्मविभूषण पुरस्कार सन्मानित गांधीवादी विचारधारी भारतीय समाजसेविका निर्मला देशपांडे यांचा जन्मदिन.
१९३६ : शांताराम नांदगावकर गीतकार (मृत्यू: ११ जुलै २००९)
१९५४ : प्रिया तेंडुलकर रंगभूमी, चित्रपट व दूरचित्रवाणीवरील अभिनेत्री, लेखिका, सामाजिक कार्यकर्त्या. 'जन्मलेल्या प्रत्येकासाठी' या त्यांच्या कथासंग्रहाला राज्य सरकारचा पुरस्कार मिळाला होता. (मृत्यू: १९ सप्टेंबर २००२)
१९५६ : भारतीय चित्रपट अभिनेते, दिग्दर्शक, निर्माता, राजकारणी आणि पंजाब राज्यातील गुरदासपूर येथील विद्यमान संसद सदस्य अजयसिंग देओल उर्फ सनी देओल यांचा जन्मदिन.
१९६१ : अजय सिंग देओल ऊर्फ 'सनी देओल' अभिनेता

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१२१६ : जॉन इंग्लंडचा राजा (जन्म: २४ डिसेंबर ११६६)
१७४५ : आयर्लंड देशातील निबंधकार, कवी, आणि व्यंगचित्रकार जोनाथन स्विफ्ट यांचे निधन.
१९३४ : विश्वनाथ कार ओडिया लेखक, संपादक व समाजसुधारक. १८९६ मधे त्यांनी एक छापखाना काढून 'उत्कल साहित्य' नावाचे सर्वस्वी साहित्याला वाहिलेले दर्जेदार नियतकालिक सुरू केले. (जन्म: २४ डिसेंबर १८६४)
१९३७ : अर्नेस्ट रुदरफोर्ड नोबेल पारितोषिक विजेते ब्रिटिश भौतिकशास्त्रज्ञ (जन्म: ३० ऑगस्ट १८७१)
१९५० : विष्णू गंगाधर तथा 'दादासाहेब' केतकर पुणे विद्यार्थी गृहाचे एक संस्थापक (जन्म: ९ एप्रिल १८८७)
१९८६ : मोझांबिक देशाचे पहिले राष्ट्रपती समोरा महेल यांचे निधन. (जन्म: २९ सप्टेंबर १९३३)
१९९५ : बाल कलाकार म्हणून पुढे आलेल्या व नंतर सहाय्यक अभिनेत्री म्हणून प्रसिद्धी पावलेल्या सलमा बेग ऊर्फ 'बेबी नाझ' यांचे निधन. (जन्म:)
२००३ : बोत्सिया व हर्जेगोविना देशाचे पहिले अध्यक्ष अलिजा इझेटबेगोविच यांचे निधन. (जन्म: ८ ऑगस्ट १९२५)

## थोडक्यात

### रेल्वेस्थानकाच्या नामांतराचे आदेश जारी

छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी

राज्य शासनाने औरंगाबाद शहराचे नामांतर छत्रपती संभाजीनगर केल्यानंतर येथील रेल्वेस्थानकाचे नामांतर करण्याचा प्रस्ताव केंद्राकडे पाठवला होता. या प्रस्तावाला मंजुरी मिळाली असून, १४ ऑक्टोबर रोजी नामांतराचे आदेश देण्यात आले आहेत. लवकरच रेल्वेस्थानकावर छत्रपती संभाजीनगर नाव झळकणार आहे.

राज्य शासनाने औरंगाबाद जिल्ह्याचे नामांतर केल्यानंतर जिल्ह्यातील राज्य शासनाच्या अधिनस्त सर्व शासकीय - निमशासकीय कार्यालयांचे नामांतर करण्यात आले. दरम्यान, काही कार्यालये केंद्राच्या अधिन असल्याने त्यांच्या नामांतरासाठी प्रस्ताव पाठवला होता. त्यात रेल्वेस्थानकाचा प्रस्ताव होता. या प्रस्तावाला नुकतीच मंजुरी मिळाली असून, राज्य शासनाने १४ ऑक्टोबर रोजी आदेश पारित करत रेल्वेस्थानकाचे नामांतर छत्रपती संभाजीनगर रेल्वेस्थानक करण्याचे आदेश जारी केले आहेत.

### शहर पोलिस दलातील कर्मचाऱ्यांच्या बदल्या

छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी

दिवाळीच्या मुहूर्तावर शहर पोलिस दलात बदल्यांचा बार उडाला. पोलिस आयुक्त प्रवीण पवार यांनी अंतर्गत बदल्यांचे आदेश काढून १५ पोलिस निरीक्षकांची खांदेपालट केली.

यामध्ये गुन्हे शाखेला पूर्णवेळ पोलिस निरीक्षक म्हणून गजानन कल्याणकर यांची वर्णी लागली आहे. वाळूज, हसूलच्या ठाणेदाराची उचलबांगडी करण्यात आली. शहर पोलिस दलात गेल्या अनेक दिवसांपासून बदल्यांचे वारे वाहत होते. अनेकजण पसंतीचे ठाणे मिळावे यासाठी प्रयत्नात होते. जूनपासून गुन्हे शाखेचा अतिरिक्त पदभार आर्थिक गुन्हे शाखेचे निरीक्षक संभाजी पवार यांच्याकडे होता. त्यांची दोन्ही शाखा अतिशय प्रभावीपणे सांभाळल्या. बदल्यांमध्ये काहींना पसंतीचे ठाणे मिळाल्याने त्यांची दिवाळी गोड झाली, तर हसूल, वाळूजच्या ठाणेदाराची उचलबांगडी करण्यात आली.

### बसखाली चिरडून पादचाऱ्याचा मृत्यू

अकोले । प्रतिनिधी

अकोले आगाराच्या बसने एका ४२ वर्षीय इसमाला चिरडल्याची दुर्दैवी घटना पिंपळगाव नाकविंदा येथे घडली. या घटनेत गणपत भानुदास लगड (वय ४२) यांचा मृत्यू झाला. याबाबत मिळालेली माहिती अशी की, अकोले आगाराची अकोले-देवगाव ही बस नेहमीप्रमाणे सायंकाळी देवगाव येथे मुक्कामी जात होती. पिंपळगाव नाकविंदा येथे गणपत भानुदास लगड हे रस्त्यावरून पायी घराकडे जात असताना बस त्यांना चिरडून पुढे निघून गेली. घटनेनंतर नागरिकांना तातडीने पोलिसांना माहिती दिली. सदर मृत व्यक्तीचा मृतदेह कोतूळ येथे शवविच्छेदनासाठी पाठविण्यात आला. घटनेचा अधिक तपास अकोले पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक मोहन बोरसे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

### आ. हेमंत ओगले यांची राज्य निवडणूक आयुक्तांकडे धाव

श्रीरामपूर । प्रतिनिधी

सध्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीची रणधुमाळी सुरू असून, प्रभाग रचनेनंतर जिल्हा परिषद पंचायत समिती व नगरपरिषदेच्या प्रारुप मतदार याद्या प्रसिद्ध झाले आहेत. त्या अनुषंगाने श्रीरामपूर नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५ करिता प्रसिद्ध झालेल्या प्रारूप मतदार यादीमध्ये मोठ्या प्रमाणावर अनियमित झाली असून त्यामध्ये तातडीने दुरुस्ती करण्याच्या सूचना देण्यात याव्या, अशी मागणी आमदार हेमंत ओगले यांनी राज्य निवडणूक आयोगाचे आयुक्त दिनेश वाघमारे यांची मुंबई येथे भेट देऊन केली आहे. निवडणूक आयुक्तांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, प्रसिद्ध करण्यात आलेल्या प्रारूप मतदार याद्यामध्ये एकाच कुटुंबाचे विभाजन, मयत व दुबार मतदारांचे नाव समाविष्ट होणे, त्याचबरोबर प्रभागांच्या सीमा ओलांडून एका प्रभागातून दुसऱ्या प्रभागामध्ये ५०० ते ७०० मतदारांची नावे समाविष्ट करण्यात आली आहेत. प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध करताना बी एल ओ यांनी स्वतः प्रभागांमध्ये जाऊन मतदार यादीवर काम करणे अपेक्षित होते मात्र हे काम प्रत्यक्षात जागेवर जाऊन न केल्याने ही सगळी गोंधळाची परिस्थिती निर्माण झालेली आहे ही बाब गंभीर स्वरूपाची असून येणाऱ्या निवडणुकांमध्ये याचे विपरीत परिणाम होणार आहेत तसेच हरकतींसाठी देखील कमी कालावधी असल्याचे आमदार ओगले यांनी आयुक्त राज्य निवडणूक आयोग यांच्या निदर्शनास आणून दिले.

# जालना शहरातील ४२ झोपडपट्टयांतील कुटुंबांना मिळणार हक्काचे घर

जालना । प्रतिनिधी

जालना शहरातील ४२ झोपडपट्टयांमधील रहिवासी असलेल्या हजारो कुटुंबांचे हक्काच्या घरांचे स्वप्न भाजपा नेत्यांच्या पाठपुराव्यामुळे साकार होणार आहे. नागपूर येथील सीएफएसडी या एजन्सीला सर्वेक्षणाचे कंत्राट मिळाले असून दीपावलीनंतर सर्वेक्षणाच्या कामाला प्रत्यक्ष सुरुवात होणार असल्याची माहिती जालन्याचे माजी आमदार तथा भाजपा नेते कैलास गोरंट्याल यांनी दिली.



जालना शहरातील ४२ झोपडपट्ट्यांमध्ये मागील अनेक वर्षांपासून वास्तव्य करत असलेल्या हजारो कुटुंबांना जागा व घरे नियमनाकुलीत करून त्यांना मालमत्ता पत्रक (पी.आर. कार्ड) द्यावे, अशी मागणी जालन्याचे माजी आमदार तथा भाजपा नेते कैलास गोरंट्याल यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे केली होती. भाजपाचे ज्येष्ठ नेते माजी केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब पाटील दानवे, माजी मंत्री आ. बबनराव लोणीकर, आ. संतोष पाटील दानवे, भाजपा जिल्हाध्यक्ष आ. नारायण कुचे, जालना महानगर जिल्हाध्यक्ष भास्करराव पाटील दानवे यांच्यासह आपण स्वतः देखील या प्रकरणी सातत्याने पाठपुरावा करत हा प्रश्न मार्गी लावण्यासाठी प्रयत्न केले. राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी माजी आमदार कैलास गोरंट्याल यांनी दिलेल्या निवेदनावर सर्वेक्षणाचे निर्देश देत सदर निवेदन मागील सप्टेंबर महिन्यात जालन्याच्या जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांना पाठवले होते. शिवाय महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात या प्रश्नासंदर्भात व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे जिल्हाधिकाऱ्यांसह सर्व संबंधित अधिकाऱ्यांची बैठक घेऊन झोपडपट्टी भागातील रहिवाशांचे सर्वेक्षण करण्याचे निर्देश दिले होते. गेल्या ४० ते ५० वर्षांपासून वास्तव्यास असूनही मालमत्ता पत्रक मिळाले नाही.

**सर्वेक्षणाचे काम दीपावली नंतर**

शहरातील झोपडपट्टी भागातील रहिवाशांच्या सर्वेक्षणाचे काम दीपावली नंतर हाती घेण्यात येणार आहे. या सर्वेक्षणानंतर झोपडपट्टी भागातील रहिवाशांचे हक्काच्या घरांचे स्वप्न साकार होणार असून घरकुल अनुदान मिळण्यासह अन्य शासकीय योजनांचा लाभ मिळण्याचा मार्ग मोकळा होणार असल्याचे कैलाश गोरंट्याल म्हणाले.

## परभणीतील कोक गावात दुषित पाण्यामुळे ८५ जणांना विषबाधा

परभणी । प्रतिनिधी

शहरापासून जवळ असलेल्या परभणी महामार्गावरील कोक गावात दूषित पाणी पिल्यामुळे विषबाधेची घटना घडली असून, ८५ हून अधिक ग्रामस्थांना रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. ग्रामस्थांना उलट्या, अतिसार, पोटदुखी, डोकेदुखीचा त्रास होऊ लागल्याने संपूर्ण गावात भीतीचे वातावरण पसरले आहे.



सदरील विषबाधेतील पहिला रुग्ण १३ ऑक्टोबर रोजी सकाळी बोरी येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल झाला. त्यानंतर दुपारी ८ रुग्ण आले होते, १४ ऑक्टोबर रोजी १८ रुग्ण, १५ ऑक्टोबर रोजी तब्बल ५१ रुग्ण उपचारासाठी दाखल झाले होते यापैकी तीन गंभीर रुग्णांना परभणी येथे रुग्णालयात हलविण्यात आले. १६ ऑक्टोबर रोजी आणखी तीन रुग्णांची नोंद झाली होती अशी माहिती डॉ. बी.के.पवार यांनी दिली. यातूनच बोरी ग्रामीण रुग्णालयात ७९ रुग्ण, परभणी जिल्हा रुग्णालयात ३, तर काही रुग्ण खाजगी रुग्णालयात उपचार घेत आहेत. अद्याप काही ग्रामस्थ आजारी असून, परिस्थितीवर नियंत्रण मिळवण्यासाठी आरोग्य यंत्रणा सज्ज झाली आहे. प्राथमिक माहितीनुसार, गावात मागील अनेक वर्षांपासून बंद असलेल्या जुन्या विहिरीतून पाणीपुरवठा करण्यात आला होता. विहिरीतील पाणी साचलेले, शेवाळयुक्त व पूर्णतः दूषित होते. हेच पाणी पिल्यामुळे अनेकांना विषबाधा झाली. घटनेची माहिती मिळताच जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.संजयकुमार पांचाळ, गटविकास अधिकारी सुभाष मानकर, तालुका आरोग्य अधिकारी डॉ.आबासाहेब जाधव व त्यांच्या पथकाने गावाला भेट देऊन पाहणी केली. सध्या गावात आरोग्य कॅम्प सुरु असून डॉक्टरांची टीम रुग्णांवर उपचार करत आहे. या घटनेमुळे गावात आरोग्याच्या प्रश्नाकडे पुन्हा एकदा लक्ष वेधले गेले असून, ग्रामस्थांनी स्वच्छ पाणीपुरवठ्याची मागणी केली आहे. प्रशासनाने तातडीने पाण्याचे नमुने तपासणीसाठी पाठवले असून दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी जोर धरू लागली आहे.

## निलंग्याच्या निळकंठेश्वर मंदिराला मिळणार राज्य संरक्षित स्मारकाचा दर्जा

लातूर । प्रतिनिधी

निलंगा शहराचे ग्रामदैवत निळकंठेश्वर मंदिर ऐतिहासिक असून याची ओळख दक्षिण काशी म्हणूनही आहे. शेकडो वर्षाचा इतिहास असलेल्या या मंदिराला राज्य संरक्षित स्मारकाचा दर्जा मिळावा, अशी मागणी माजी मंत्री आमदार संभाजी पाटील निलंगेकर यांनी केली होती. या संदर्भात राज्याचे सांस्कृतिक मंत्री आशिष शेलार यांची भेट घेवून माजी मंत्री आ. निलंगेकर यांनी निळकंठेश्वर मंदिराची संपूर्ण माहिती दिली. शेलार यांनी तात्काळ याबाबत सकारात्मकता दाखवत निळकंठेश्वर मंदिराला राज्य संरक्षित स्मारकाचा दर्जा मिळण्यासाठी कार्यवाही करण्याचे निर्देश दिले आहेत. त्यामुळे आता निलंग्याच्या निळकंठेश्वर मंदिराला राज्य संरक्षित स्मारकाचा दर्जा मिळून हा ऐतिहासिक वारसा जपला जाणार आहे.

निलंग्याचे ग्रामदैवत असलेले निळकंठेश्वर मंदिराची उभारणी चालुक्यांच्या काळात झाली असून हे मंदिर म्हणजे स्थापत्य आणि मूर्तीकलेचा उत्कृष्ट नमूना आहे. या मंदिरात दोन गर्भगृह असून मुख्य गर्भगृहात शिवलिंग स्थापित झाले आहे. तसेच दुसया गर्भगृहात अतिशय दूर्मिळ मानली जाणारी उमा महेश्वर यांची मूर्ती आहे. मंदिराच्या बाह्यभागावर शंभरहून अधिक विलोभनिय शिल्पमूर्ती कोरलेल्या असून यामध्ये शिव, विष्णू, महिशासूर मर्दिनी यासारख्या देवतांसह सूर सुंदरीच्या प्रतिमांचा समावेश आहे. मंदिराच्या दर्शनासाठी आणि मंदीर पाहण्यासाठी लातूर जिल्ह्यातीलच नव्हे तर मराठवाड्यातील अनेक भाविक सातत्याने निलंगा येथे येत असतात.

निळकंठेश्वर मंदिर आपल्या शहराचा आत्मा असून हजारो वर्षापासून श्रध्दा, इतिहास आणि कला या त्रिवेणीचा सगंम येथे असल्याचे सांगितले. हा ऐतिहासिक आणि पुरातन ठेवा जतन करणे ही आपली सामूहिक जबाबदारी असल्यामुळे या मंदिराला राज्य संरक्षित स्मारकाचा दर्जा मिळावा यासाठी पाठपुरावा केला होता,. सांस्कृतिक मंत्री आशिष शेलार यांनी यास मान्यता दिल्याबद्दल त्यांचे आभार या निर्णयामुळे निळकंठेश्वर मंदिर केवळ जिल्ह्याच्याच नव्हे तर मराठवाडा आणि राज्याच्या नकाशावर झळकणार आहे.

## साई बाबा संस्थानच्या ४७ अधिकाऱ्यांवर गुन्हा दाखल; शिर्डीत मोठी खळबळ

अहिल्यानगर । प्रतिनिधी

साईबाबांच्या पवित्र धामात भ्रष्टाचाराचा भूकंप आला आहे. हा साधा सुधा भूकंप नाही तर खूप मोठा घोटाळा आहे. शिर्डी साई संस्थानच्या विद्युत विभागात ७७ लाख रुपयांचे विद्युत साहित्य चोरीला गेल्याच्या प्रकरणी तब्बल ४७ अधिकाऱ्यांवर गुन्हा दाखल झाला आहे. या कारवाईमुळे संपूर्ण शिर्डीत खळबळ उडाली असून भक्तांमध्ये राग आणि आश्चर्य पसरले आहे. सामाजिक कार्यकर्ते संजय काळे यांच्या धैर्यवान लढ्यामुळे हे काळे कृत्य उघड झाले आहे. चला, जाणून घेऊया या प्रकरणाचा थरारक किस्सा

२०२२ मध्ये संजय काळे यांनी संस्थानच्या विद्युत विभागात लाखो रुपयांचे वायर, ट्रान्सफॉर्मर, बल्ब आणि इतर महत्त्वाचे साहित्य गायब झाल्याची तक्रार केली. त्यांच्या याचिकेवर मुंबई उच्च न्यायालयाने धाडसाने आदेश दिला की तात्काळ चौकशी करा आणि गुन्हा दाखल करा! पोलिसांनी तातडीने धुरळा उडवला. प्राथमिक तपासात धक्कादायक सत्य समोर आले. विभाग प्रमुख, अभियंते, सहाय्यक कर्मचारी असे एकूण ४७ जणांनी मिळून हे साहित्य चोरले आणि विकले असल्याची खात्री पटली. शिर्डी पोलिस ठाण्यात हा गुन्हा दाखल झाला. सीसीटीव्ही फुटेज, बिलांची तपासणी आणि साक्षीदारांच्या जबानींमुळे चोरीची रक्कम नेमकी ७७ लाख इतकीच.. ''हे साहित्य मंदिराच्या दिव्य प्रकाशासाठी होते, पण ते हाताळणाऱ्यांनीच अंधार केला,'' असे काळे यांनी भावूक होऊन सांगितले. या प्रकरणामुळे संस्थान प्रशासनाच्या कामकाजावर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. प्रमुख अधिकाऱ्यांची कसून चौकशी सुरू असून आणखी काही उघड होण्याची शक्यता आहे.भक्त म्हणतात, ''साईबाबा सर्वकाही पाहत असतील.. हे भ्रष्टाचार थांबवण्यासाठी आम्ही उभे आहोत.'' पोलिस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार लवकरच या लोकांना अटक होणार असून संपूर्ण तपशील जाहीर होईल.

## अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांसाठी सरकारचे फसवे पॅकेज; राष्ट्रवादीकडून काळी दिवाळी आंदोलन

कर्जत । प्रतिनिधी

अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांसाठी सरकारने जाहीर केलेले पॅकेज फसवे असल्याचा आरोप करीत राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षातर्फे राज्यभर काळी दिवाळी साजरी करून निषेध नोंदविण्यात आला. कर्जत येथे प्रांताधिकारी कार्यालयासमोर आ. रोहित पवार यांच्या नेतृत्वाखाली पदाधिकारी, कार्यकर्ते आणि शेतकरी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.



या वेळी सरकारकडे सरसकट कर्जमाफी, नियमित कर्ज फेडणाऱ्या शेतकऱ्यांना ७५ हजार रुपये प्रोत्साहनपर रक्कम आणि अतिवृष्टीग्रस्तांना हेक्टरी ५० हजार रुपये मदत देण्याची मागणी करण्यात आली. गेल्या महिन्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे राज्यातील तब्बल ६० लाख हेक्टर क्षेत्राचे नुकसान झाले आहे. मात्र, सरकारकडून घोषित मदत शेतकऱ्यांच्या खर्चाच्या तुलनेत अत्यंत तुटपुंजी असल्याची टीका करण्यात आली. कोरडवाहू शेतकऱ्यांसाठी जाहीर साडेआठ हजारांच्या मदतीत केवळ काही शेतकऱ्यांनाच लाभ मिळणार असल्याने संताप व्यक्त करण्यात आला. याशिवाय रब्बी हंगामाच्या तयारीसाठी हेक्टरी १० हजारांची मदतही अपुरी असल्याचे मत या वेळी मांडण्यात आले. सोयाबीन, कापूस, उडीद, तूर, ऊस आदी पिकांचे मोठे नुकसान झाले असताना पंचनामे अद्याप पूर्ण न झाल्याने शेतकरी अडचणीत आहेत. बाजारात पिकांना हमीभावापेक्षाही कमी भाव मिळत असल्याने शेतकऱ्यांचे आर्थिक संकट अधिकच गडद झाले आहे. पशुधनाच्या मृत्यूसाठी सरकारकडून जाहीर करण्यात आलेली मदत बाजारभावाच्या तुलनेत अत्यल्प असल्याने जनावरांच्या नुकसानीचे खरे नुकसान भरून येत नसल्याची खंत आंदोलकांनी व्यक्त केली. सरकारच्या पॅकेजच्या नावाखाली अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांची फसवणूक झाली आहे. सरसकट कर्जमाफी आणि हेक्टरी ५० हजारांची मदत देईपर्यंत आम्ही रस्त्यावर संघर्ष करत राहू, असा इशारा आ. पवार यांनी दिला. या आंदोलनादरम्यान प्रांताधिकाऱ्यांना मागण्यांचे निवेदन देण्यात आले असून, सरकारने तत्काळ ठोस निर्णय घ्यावा, अशी मागणी शेतकऱ्यांकडून करण्यात आली.

# वडवणीच्या रामलिंग पतसंस्थेला पाचव्यांदा राज्यस्तरीय दिपस्तंभ पुरस्कार प्रदान

### सर्वांचा विश्वास हिच आमची शक्ती-चेअरमन नारायणराव डिगे

वडवणी। प्रतिनिधी

मराठवाड्याच्या सहकार क्षेत्रात अग्रगण्य असलेल्या व बीड जिल्ह्याच्या सहकार क्षेत्रातील मुकूटमणी असलेल्या वडवणी तालुक्याचे भूषण रामलिंग नागरी सहकारी पतसंस्था म.ता.वडवणी या पतसंस्थेने ग्राहकांची विश्वासार्हता संपादित करुन सहकार क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरी व महाराष्ट्रातील पतसंस्था चळवळीसाठी एका दिपस्तंभाप्रमाणे कार्य करुन पतसंस्था चळवळीला चांगली दिशा देवून दिशादर्शक बनण्याचे कार्य केल्याबध्दल महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशन लि. यांच्या वतीने तब्बल पाचव्या वेळेस सहकार क्षेत्रातील मानाचा असा समजला जाणारा राज्यस्तरीय दिपस्तंभ पुरस्कार सन २०२४-२५ हा नुकताच एका भव्य कार्यक्रमामध्ये गोकर्ण महाबळेश्वर कुमठा, कर्नाटक याठिकाणी मान्यवरांच्या उपस्थितीत व हस्ते प्रदान करण्यात आला.

वडवणी येथिल रामलिंग नागरी सहकारी पतसंस्था म.ता.वडवणी या पतसंस्थेने बीड जिल्ह्याच्या नव्हे तर मराठवाड्याच्या सहकार



क्षेत्रात आपल्या पारदर्शक, तत्पर व विनम्र सेवेतून हजारो ग्राहकांचा विश्वास संपादन करीत सहकाराचे मोठे जाळे विणले आहे. अनेक अभिनव व सामाजिक उपक्रमांतून पतसंस्थेने आपली वेगळेपणाची चुणूक नेहमीच दाखवली आहे. तसेच पतसंस्थेच्या उत्तम कामगिरीतून राज्याच्या सहकार क्षेत्राचे लक्ष आपल्याकडे वेधले आहे. संपूर्ण महाराष्ट्र राज्यातील सहकार क्षेत्रात महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशन लि. यांच्या वतीने दिला जाणारा दिपस्तंभ पुरस्कार हा सन्मान अतिशय महत्त्वाचा, प्रतिष्ठेचा व बहूमानाचा मानला जातो. रामलिंग पतसंस्थेने या अगोदर चार वेळेस सन २०१८-१९, २०१९-२०, २०२०-२१, २०२३-२४ चा राज्यस्तरीय दिपस्तंभ पुरस्कार मिळवला होता. त्यानंतर यावर्षीही पाचव्यांदा दिपस्तंभ पुरस्कार सन २०२४-२५ हा पुरस्कार मिळवला असून छत्रपती संभाजीनगर विभागातील ५० कोटी ते १०० कोटी या गटामधून हा दिपस्तंभ पुरस्कार रामलिंग पतसंस्था वडवणी यांना काही दिवसांपूर्वीच जाहीर झाला होता. एका भव्य कार्यक्रमामध्ये कर्नाटक राज्यातील गोकर्ण महाबळेश्वर कुमठा येथील डेनिसन्स रिसार्ट याठिकाणी दि.१३ ऑक्टोबर २०२५ रोजी मान्यवरांच्या उपस्थितीत व हस्ते हा प्रदान करण्यात आला. याप्रसंगी महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशनचे अध्यक्ष ओमप्रकाश दादाप्पा उर्फ काकासाहेब कोयटे, मुख्य कार्यकारी अधिकारी सौ.सुरेखा लवांडे, कर्नाटक राज्य सहकारी पतसंस्था महासंघ लि.बंगळूरुचे अध्यक्ष चंद्रशेखर सी.एस., कर्नाटक राज्य सौहार्दा फेडरल सहकारी लि.बंगळूरुचे अध्यक्ष जी.नंजना गौडा, संयुक्त निबंधक सहकारी विभाग बेळगांव प्रांत कलाप्पा ओबँगोल, माजी सहकार आयुक्त महाराष्ट्र राज्य श्रीकृष्ण वाडेकर, सहकार आयुक्त कर्नाटक संजय हौसमठ इत्यादी अनेक उपस्थित होते. या मान्यवरांच्या हस्ते रामलिंग पतसंस्थेला हा राज्यस्तरीय दिपस्तंभ पुरस्कार सन्मानचिन्हे, सन्मानपत्र, पुष्पगूच्छ देवून सन्मान करत प्रदान करण्यात आला. हा पुरस्कार स्विकारण्यासाठी चेअरमन नारायणराव डिगे, व्यवस्थापक दिगांबर गुरसाळी, सर्वश्री संचालक कचरुशेठ झाडे, सुरेशराव ढवळशंक, नवनाथराव म्हेत्रे, अरुणराव गुरसाळी, प्रकाशराव डिगे, उपमन्यूजी वारे, वैजनाथ डिगे, सुभाषराव वाव्हळ, बाबासाहेब मस्के, शिवाजीराव टकले, अर्जुनराव भंडारे हे उपस्थित होते.

दरम्यान रामलिंग पतसंस्थेच्या आजवरच्या यशस्वी वाटचालीत सर्व सभासद बंधु व हजारो ग्राहकांचा सिंहाचा वाटा असून सर्वांच्या विश्वासार्हतेला व उदंड सहकाऱ्याला हा पुरस्कार अर्पण असून सर्वांचा विश्वास हिच आमची खरी शक्ती असल्याचे मत चेअरमन नारायणराव डिगे यांनी पुरस्कार स्विकारतांना व्यक्त केले व पुरस्काराबध्दल महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशनचे आभार मानले. दरम्यान वडवणी तालुक्यासारख्या ग्रामीण भागातून सहकार क्षेत्रात उत्तुंग गरुडझेप घेणाऱ्या रामलिंग पतसंस्थेच्या या पाचव्या वेळेस मिळविलेल्या राज्यस्तरीय दिपस्तंभ पुरस्काराच्या यशाबध्दल पतसंस्थेचे चेअरमन नारायणराव डिगे, व्यवस्थापक दिगांबर गुरसाळी, सर्वश्री संचालक कचरुशेठ झाडे, सर्जेराव महाराज आळणे, सुरेशराव ढवळशंक, नवनाथराव म्हेत्रे, अरुणराव गुरसाळी, प्रकाशराव डिगे, उपमन्यूजी वारे, वैजनाथ डिगे, सुभाषराव वाव्हळ, बाबासाहेब मस्के, शिवाजीराव टकले, अर्जुनराव भंडारे व सर्व कर्मचारी वृंद यांचे सर्वत्र अभिनंदन व कौतुक होत आहे.

# बिबट्याच्या हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या शेतकऱ्याच्या कुटुंबाला दहा लाखांची मदत

## आ.सुरेश धस यांच्या पाठपुराव्यामुळे वनमंत्री नाईक यांचा प्रत्यक्ष हस्तक्षेप

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील बावी येथे घटलेली दुर्दैवी घटनेमध्ये तरुण शेतकरी स्व. राजेंद्र विश्वनाथ गोल्हार (वय ३९) यांचा बिबट्याच्या हल्ल्यात मृत्यू झाला, त्या कुटुंबासाठी आर्थिक मदत मिळवण्यासाठी आमदार सुरेश धस यांनी वनविभागाकडे पाठपुरावा करून तात्काळ मदत मिळून दिली.

या हृदयद्रावक घटनेनंतर आमदार सुरेश धस यांनी तत्काळ वन विभाग व प्रशासनाशी संपर्क साधला आणि निधीअभावी निर्माण झालेल्या अडचणीवर लक्ष केंद्रित करून मा. वनमंत्री श्री. गणेश नाईक साहेबांकडे पाठपुरावा केला. त्यांच्या



प्रयत्नामुळे कुटुंबासाठी तातडीची मदत मंजूर करण्यात आली.

यामुळे स्व. राजेंद्र गोल्हार यांच्या पत्नी सौ. कौशल्या गर्जे यांना १० लाख रुपयांची तातडीची मदत सुपूर्त करण्यात आली असून, उर्वरित १५ लाख रुपयांची मुदत ठेव रक्कम दोन दिवसांत त्यांच्या बँक खात्यात जमा होणार आहे. या आर्थिक मदतीमुळे कुटुंबाला गंभीर संकटात थोडासा आधार मिळाला आहे. आमदार सुरेश धस यांच्या पुढाकारामुळे कुटुंबाला आवश्यक ती मदत मिळाली आणि प्रशासनिक प्रक्रिया त्वरीत पार पडली.

या प्रसंगी विभागीय वन अधिकारी गर्कळ साहेब, वनपरीक्षेत्र अधिकारी मुंडे, मा. सभापती लक्ष्मण ननवरे, बाबू गर्जे, पोपट गर्जे, धनंजय तरटे, अक्षय लटपटे व सरपंच, उपसरपंच, स्थानिक ग्रामस्थ आणि शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शेतकऱ्यांच्या अनुदानातून कर्ज वसुली करू नये

## बँक खाते होल्ड न करण्याचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांचे आदेश

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यामध्ये ऑगस्ट व सप्टेंबर मध्ये मोठ्या प्रमाणात अतिवृष्टी व पुरामुळे शेतकऱ्यांच्या शेती पिकाचे नुकसान झाले. यासाठी सरकारने ६३४.५१ कोटी रुपये अनुदान देण्याचा निश्चय केला आहे. या पोटी ही रक्कम प्राप्त झाली आहे. या रकमेतून बँकांनी कोणतीही कर्ज वसुली करू नये किंवा शेतकऱ्यांचे खाते होल्ड करू नये असे स्पष्ट आदेश जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी एका प्रसिद्धी पत्रका द्वारे दिले आहेत.



बीड जिल्ह्यामध्ये ऑगस्ट -सप्टेंबर मध्ये अतिवृष्टी आणि पुरामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले. शासन निर्णयानुसार जिल्ह्यातील ८ लाख ७२ हजार ८८४ शेतकऱ्यांना ६३४.५१ कोटी रुपये अनुदान प्राप्त झाले आहे. जिल्ह्यातील बाधित शेतकऱ्यांची संख्या मोठी असून दिवाळीपूर्वी मदत बँक खात्यात जमा करणे तसेच शेतकऱ्यांना आवश्यकतेनुसार रक्कम आहारित करणे यात कोणती अडचणी निर्माण होऊ नये याची बँकांनी दक्षता घेणे आवश्यक आहे. बँक खात्यात जमा झालेल्या निधीमधून कर्ज खात्यात रक्कम जमा केली जाते किंवा त्यांचे खाते होल्ड केले जाते. हे प्रकार बँकांनी करू नयेत असे स्पष्ट आदेश जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिले आहेत. याबाबत सर्व बँकांना सूचना देण्यात आल्या असून जर असा प्रकार आढळून आला तर बँक अधिकाऱ्यावर कारवाई केली जाईल असा सज्जड दमही जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी दिला आहे.

# दिव्यांग बांधवांच्या सक्षमीकरणासाठी कटिबद्ध - अमरसिंह पंडित

## १६४ दिव्यांग लाभार्थ्यांना मंजुरी पत्राचे सन्मानपुर्वक वाटप

गेवराई । प्रतिनिधी

गेवराई विधानसभा मतदार संघातील दिव्यांग बांधवांच्या सक्षमीकरणासाठी शिवछत्र परिवार कटिबद्ध आहे. शासकीय योजनांचा दिव्यांग बांधवांना लाभ मिळवुन देण्यासाठी जाणिवपुर्वक प्रयत्न करत असल्याचे प्रतिपादन माजी आमदार अमरसिंह पंडित यांनी केले. धनत्रयोदशीच्या शुभ मुर्हतावर त्यांच्या शुभहस्ते १६४ लाभार्थ्यांना संजय गांधी निराधार अनुदान योजनेच्या मंजुरी पत्राचे सन्मानपुर्वक वाटप करण्यात



आले. यावेळी व्यासपीठावर नायब तहसिलदार संजय सोनवणे, राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष भाऊसाहेब नाटकर, माजी नगराध्यक्ष महेश दाभाडे, माजी नगरसेवर राधेशाम येवले यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

गेवराई तालुक्यातील दिव्यांग बांधवांना शासकीय योजनांचा लाभ मिळवुन देण्यासाठी आ. विजयसिंह पंडित यांच्या कार्यालयात वेगळा कक्ष कार्यान्वीत करण्यात आला आहे. दिव्यांग बांधवांच्या सक्षमीकरणासाठी शिवछत्र परिवाराकडुन जाणिवपुर्वक प्रयत्न होत आहेत. शनिवार दि. १८ ऑक्टोबर रोजी कृष्णाई कार्यालयात आयोजित केलेल्या कार्यक्रमात १६४ दिव्यांग बांधवांना संजय गांधी निराधार अनुदान योजनेतील मंजुरी पत्राचे माजी आमदार अमरसिंह पंडित यांच्या शुभहस्ते सन्मानपुर्वक

◀◀ पान २ वर

# हिंदू-मुस्लिम महिलांचा शिवसेना पक्षात प्रवेश

## बीड जिल्ह्याला गत वैभव प्राप्त करून देऊ -अंबादास दानवे

बीड । प्रतिनिधी

आज शनिवारी महाराष्ट्र राज्याचे माजी विरोधी पक्षनेते तथा शिवसेना नेते अंबादासजी दानवे यांच्या नेतृत्वाखाली व शिवसेना जिल्हाप्रमुख गणेश भाऊ वरेकर यांच्या पुढाकाराने, तालुकाप्रमुख गोरख अण्णा सिंगन, युवा नेते बिलाल भाई, यांच्या प्रमुख उपस्थितीत बीड शहरातील राष्ट्रवादी अजित पवार गटाच्या राष्ट्रवादी युवती जिल्हा सचिव नुजहत सिद्दिकी, महिला अल्पसंख्याक शहराचे अध्यक्ष शेख यास्मिन वाहेद, अश्विनी बप्पासाहेब गायके, दीपा दिने जाधव, प्रेरणा यश कसबे, यांच्यासह बीड शहरातील अनेक हिंदू-मुस्लिम महिलांनी छ.संभाजीनगर येथील अंबादास दानवे यांच्या संपर्क कार्यालयात शिवसेना उद्धव बाळासाहेब



ठाकरे पक्षात जाहीर प्रवेश केला. या प्रवेशामुळे बीड शहरातील राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अजित पवार गट यांना मोठा झटका बसलेला आहे व भविष्यात शिवसेनेची ताकद वाढण्यासाठी मोठी मदत होणार आहे.

यावेळी बोलताना शिवसेना नेते अंबादास दानवे यांनी असे म्हटले की बीड जिल्हा हा पूर्वीपासूनच शिवसेनेला

◀◀ पान २ वर

# दीपावली निमित्त आष्टी बाजारपेठेत गर्दी

**आष्टी । प्रतिनिधी**

मागच्या काही दिवसापूर्वी आष्टी तालुक्यातील जवळपास बहुतांशी भागात अतिवृष्टी झाल्याने फार मोठी पुर परिस्थिती निर्माण झाली होती यामुळे हाता तोंडाशी आलेले पीक अक्षरशः धना सहीत वाहुन गेले काहींच्या जमिनी देखील वाहून गेल्या अशा परिस्थितीमध्ये शेतकरी यंदा हवां दिन झाला सरकारने नुकसान भरपाई चे पैसे शुक्रवार मध्यरात्रीपासून शेतकऱ्यांच्या खात्यावर पाठवण्यास सुरुवात केली असून नुकसान मोठ्या प्रमाणावर झाले आहे मदत जरी तुटपुंजी असली तरी



मूर्तीला काडीचा आधार अशा पद्धतीने आज आष्टी शहरातील बाजारपेठेमध्ये कपड्याची दुकाने स्टेशनरी दुकानांमध्ये किराणा दुकानांमध्ये गर्दी दिसून आली छत्रपती शिवाजी महाराज चौक शनी चौक या दोन्ही चौकामध्ये कपड्याची दुकाने किराणा दुकाने तसेच आकाश कंदील दिवा लावण्यासाठी पण ती महालक्ष्मीची मूर्ती व इतर काही शोभेच्या वस्तू घेण्यासाठी नागरिकांनी आज गर्दी केली होती आष्टी शहरातील भाई भाई इव्हेंट

◀◀ पान २ वर

# लोकनेते स्व.गोपिनाथ मुंडे वृद्धाश्रमात दिवाळी फराळ वाटप



बीड । प्रतिनिधी

दि.१८ रोजी श्री विठ्ठल रुक्मिणी सेवाभावी संस्था पोखरी संचलित घाटसावळी येथील लोकनेते स्व गोपीनाथराव मुंडे वृद्धाश्रम घाटसावळी व जनसेवा व्यसनमुक्ती केंद्र घाटसावळी येथे राजयोग फाऊंडेशनचे अध्यक्ष तथा नगरसेवक शुभम धुत व रोटरी क्लब ऑफ बीड मिडटाऊन यांच्या संयुक्त विद्यमाने दिवाळी फराळ वाटप करण्यात आला.

कार्यक्रमात मान्यवरांचा सत्कार

◀◀ पान २ वर

# आरोग्य कर्मचारी महासंघाच्या बीड जिल्हाध्यक्षपदी अशोक ठोसर तर उपाध्यक्षपदी करणकुमार जोगदंड



**बीड । प्रतिनिधी**

आरोग्य कर्मचारी महासंघाच्या जिल्हाध्यक्षपदी अशोक ठोसर तर उपाध्यक्षपदी करणकुमार जोगदंड यांची निवड करण्यात आली.

आरोग्य कर्मचारी महासंघाचे राज्याध्यक्ष विजय मोहरकर आणि राज्यउपाध्यक्ष शेळके व बाबासाहेब राख यांच्या विशेष उपस्थितीत आरोग्य कर्मचारी महासंघ बीड जिल्हा कार्यकारिणीची निवड करण्यासाठी बैठक घेण्यात आली. यात जिल्हाध्यक्षपदी अशोक रामनाथ ठोसर यांची तर जिल्हा उपाध्यक्षपदी करणकुमार जोगदंड यांची सर्वांमध्ये निवड जाहीर करण्यात आली. यावेळी जिल्हा हिवताप अधिकारी विजयसिंह शिंदे, सुनिल गायकवाड, जीवन सानप, एस. पी कुलकर्णी, सुधाकर कुलकर्णी, राजेश कोलुगडे यांनी उपस्थित राहून नवनियुक्त पदाधिकाऱ्यांना शुभेच्छा दिल्या. संघटनेच्या कामाला गती देण्यासाठी आणि आरोग्य कर्मचाऱ्यांचे प्रश्न प्रभावीपणे मांडण्यासाठी ही निवड महत्त्वाची ठरणार आहे. नवनियुक्त जिल्हाध्यक्ष अशोक ठोसर यांनी कर्मचाऱ्यांच्या हितासाठी महासंघ कटीबद्ध राहील असे आश्वासन दिले याप्रसंगी महासंघाचे पदाधिकारी, सदस्य उपस्थित होते.

# चांदणे शिंपीत जाशी ते कैवल्याच्या चांदण्याला रसिक मंडळ माजलगावची सुरेल मैफल !

माजलगाव ( प्रतिनिधी )

रसिक मंडळ माजलगाव चा नामांकित कडुन मानांकित कडे वाटचाल करणारा पं. विष्णु दिंगबर पलुस्कर दोन दिवशीय स्मृती समारोहाने माजलगाव कर सुरांच्या चांदण्यात न्हावुन गेले.

दि. १६ ऑक्टोबर रोजी श्री सिद्धेश्वर महाविद्यालयाच्या भारतमाता सभागृहात समारोहाचे उद्घाटन पं. विजय देशमुख यांच्या हस्ते संपन्न झाले. अध्यक्ष स्थानी डॉ. नरेंद्र निळेकर होते तर दिन प्रमुख ॲड चौकिदार यांची व गायक



कलावंत वेद मुळे व आराध्या कदम यांची प्रमुख उपस्थिती होती.

दिपप्रज्वलन प्रतिमा पूजनानंतर स्वागत समारंभ संपन्न झाला. प्रास्ताविक प्रा. स्नेहल पाठक यांनी केले. उद्घाटक पं. विजय देशमुख म्हणाले .. माजलगाव चे सांगितिक नाव भारतिय पटलावर नेण्यास रसिक मंडळाचे योगदान लक्षवेधी आहे. मी स्वतः या मंडळाच्या उद्घाटन कार्यक्रम प्रसंगी फार पुर्वीच राग मधुकंस सादर केलेला आहे. आज मला खुप आनंद होतोय.

डॉ. निळेकर यांनी अध्यक्षीय मनोगत व्यक्त केले. सुत्रसंचालन बालाप्रसाद चव्हाण यांनी केले तर आभार डॉ. प्रकाश खोडसकर यांनी मानले. आणि मागील वर्षी च्या दोन्ही गटातील विजेत्यांची भन्नाट सुरेल मैफल सुरू झाली.


लातूरची चिमुकली आराध्या कदम हीने आपल्या व्हर्सटाईल गायन शैलीने सभागृहास मंत्रमुग्ध केले. नाट्यपद ते बालगीत या वैविध्यपूर्ण सादरीकरणाने मजा आली. तिचे ''चांदणे शिंपीत जाशी चालता तु चंचले '' हे गीत अप्रतिम झाले. मोठ्या गटाचा विजेता बीड येथील वेद दिपक मुळे यांच्या दमदार

◀◀ पान २ वर

# धनंजय मुंडेंनी निष्ठेच्या गप्पा मारू नयेत -आ.सोळंके

बीड । प्रतिनिधी

बीडच्या ओबीसी महाएल्गार मेळाव्यातून राष्ट्रवादीचे आमदार धनंजय मुंडे यांनी माजलगाव चे आमदार प्रकाश सोळंके आणि विजयसिंह पंडित यांचे नाव न घेता त्यांच्यावर टीका केली होती त्याला आमदार सोळंके यांनी खरमरीत उत्तर देत मुंडेंनी स्वतःपुरतं बघावं निष्ठेच्या गप्पा मारू नयेत आम्ही त्यांच्यापेक्षा सीनियर आहोत चिल्लर नाहीत असं म्हणत हल्लाबोल केला आहे. राष्ट्रवादी अजित पवार गटातच हा वितंड वाद सुरू झाल्याने दादा जिल्ह्यातील नेत्यांना समज देणार का अशी चर्चा सुरू झाली आहे.



बीडमध्ये ओबीसी महाएल्गार मेळावा आयोजित करण्यात आला होता. या मेळाव्यात आ.धनंजय मुंडे यांनी आ.प्रकाश सोळंके यांना निवडून आणण्यासाठी मदत केल्याचे म्हटले होते. त्यावर उत्तर देताना त्यांच्याच गटाचे आमदार प्रकाश सोळंके यांनी धनंजय मुंडेंवर सडकून टिका केली. माध्यमांशी बोलताना प्रकाश सोळंके म्हणाले, धनंजय मुंडेंनी कोणाला मदत केली सांगायची गरज नाही. धनंजय मुंडेंना राजकारणात कोणी आणलंय हे त्यांनी सांगावं, फार मोठे झाल्यासारखं त्यांना वाटत असेल त्यांनी जमिनीवर पाय ठेवून बोलावं आणि पक्षनिष्ठाच्या गप्पा तर त्यांनी मारूच नये. त्यांची पक्षनिष्ठा किती आहे हे मला माहित आहे. कारण माझ्या विरोधातच एकाच पक्षाचे असताना दोन ओबीसीचे उमेदवार उभे केले होते. गेवराई मतदार संघातही विजयसिंह पंडितांच्या विरोधात आणि आष्टी मतदारसंघात सुरेश धस यांच्याविरोधात ओबीसी उमेदवार उभे करण्यात आले होते. त्यांचीही पक्षनिष्ठा जगजाहिर आहे. त्यांनी पक्षनिष्ठेच्या गप्पा मारू नयेत, जीवनात कोणाशी निष्ठा ठेवली हेच त्यांनी सांगावे. आमच्यावर बोलताना त्यांनी सांभाळून बोलावे कारण मी पाच वेळा आमदार झालोय, विजयसिंह पंडित सुद्धा त्यांच्या वडिलांच्या काळापासून राजकारणात आहेत. धनंजय मुंडेंचा जन्मही झाला नसेल तेव्हापासून पंडित कुटुंब राजकारणात आहे. धनंजय मुंडेंचा अभ्यास कमी आहे असे म्हणत त्यांनी लक्ष्मण

◀◀ पान २ वर

# राक्षसवाडी ग्रामस्थांना स्वामी विवेकानंद शाळेचा मदतीचा हात

अंबाजोगाई । प्रतिनिधी

अंबाजोगाई) स्वामी विवेकानंद बाल विद्यामंदिर अंबाजोगाई शाळेत ''स्वरमंजिरी - संगीत संध्या'' हा दिवाळीनिमित्त कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाप्रसंगी शाळेतील मुला-मुलींनी विविध कलागुणांचे प्रदर्शन केले. या कार्यक्रमास शहरातील अनेक मान्यवर उपस्थित होते. या कार्यक्रमावेळीच राक्षसवाडी येथील पूरग्रस्त शेतकरी बांधवांच्या दुःखात सामील होत स्वामी विवेकानंद शाळेकडून मदतीचा हात म्हणून दैनंदिन गरजेच्या वस्तूंचे किट वाटप करण्यात आले.



शाळेतील सर्व शिक्षक, विद्यार्थी यांनी मदतीचा हात पुढे करत एकूण ४०००० रुपयांचे धान्य वाटप केले.

काल नवक्षितिज बहुउद्देशीय शिक्षण संस्था संचलित, स्वामी विवेकानंद बाल विद्यामंदिर शाळेमध्ये ''स्वरमंजिरी संगीत संध्या'' हा कार्यक्रम दिवाळीनिमित्त आयोजित करण्यात आला होता. शाळेच्या दीपोत्सव या कार्यक्रमाची परंपरा मोठी आहे. यावर्षीचे दीपोत्सवाचे १९वे वर्ष होते. प्रथेप्रमाणे दरवर्षी इयत्ता चौथीतील मुले दिवाळीसाठी शाळेमध्ये येऊन राहतात व दिवाळी साजरी करतात. दुसऱ्या दिवशी सकाळी सर्व विद्यार्थी पहाटेच उठून व्यायाम, उपासना व अभ्यंगस्नान करतात. यावर्षी सकाळच्या सत्रात ''वाचन प्रेरणा दिनानिमित्ताने'' अंबाजोगाईतील साहित्य निकेतन ग्रंथालय व शाळेच्या संयुक्त विद्यमाने शाळेमध्ये सामूहिक पुस्तक वाचनाचा कार्यक्रम पार पडला. संध्याकाळी मुलांमधील विविध कलागुणांना वाव देण्यासाठी ''स्वरमंजिरी - संगीत संध्या'' हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. याप्रसंगी इयत्ता तिसरी ते सातवीतील विद्यार्थ्यी व संगीत शिक्षिका श्रीमती श्रीदेवीताई पवार यांच्या गटाने विविध रागातील सुरेल अशी समूहगीते सादर केली. कु. आस्था हिने बहारदार नृत्य सादर केले, शहरातील प्रसिद्ध बासरीवादक श्री. भागवत पाठक यांच्या बासरीवादनाचा कार्यक्रम झाला त्यांना श्री. रत्पदीप शिगे यांनी तबल्यावर साथ दिली. श्री. सुभाष शेप व श्री. आसाराम जोशी यांनी सुंदर गीते सादर केली. सर्वात शेवटी चि. अभिमन्यू

◀◀ पान २ वर

# रामलिंग पतसंस्थेला पाचव्यांदा राज्यस्तरीय दिपस्तंभ पुरस्कार प्रदान

## सर्वांचा विश्वास हिच आमची शक्ती - चेअरमन नारायणराव डिगे

वडवणी । प्रतिनिधी

मराठवाड्याच्या सहकार क्षेत्रात अग्रगण्य असलेल्या व बीड जिल्ह्याच्या सहकार क्षेत्रातील मुकूटमणी असलेल्या वडवणी तालुक्याचे भूषण रामलिंग नागरी सहकारी पतसंस्था म.ता.वडवणी या पतसंस्थेने ग्राहकांची विश्वासार्हता संपादित करुन सहकार क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरी व महाराष्ट्रातील पतसंस्था




चळवळीसाठी एका दिपस्तंभाप्रमाणे कार्य करुन पतसंस्था चळवळीला चांगली दिशा देवून दिशादर्शक बनण्याचे कार्य केल्याबध्दल महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशन लि. यांच्या वतीने तब्बल पाचव्या वेळेस सहकार क्षेत्रातील मानाचा असा समजला जाणारा राज्यस्तरीय दिपस्तंभ पुरस्कार सन २०२४-२५ हा

◀◀ पान २ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा...नवे विचार...

पुणे विशेष

रविवार, दि.१९ ऑक्टोबर २०२५ । पान ७

# कामचुकार अधिकाऱ्यांना घरी बसविणार : आयुक्त नवलकिशोर राम



**मांजरी । प्रतिनिधी**

चार वर्षे उलटूनही समाविष्ट गावातील प्राथमिक सुविधांबाबतच्या समस्या अद्याप सुटू शकल्या नाहीत. कचरा, ड्रेनेज, वीज, पाणी, रस्त्यावरील खड्डे, वाहतूक कोंडी आणि दररोजच्या साफसफाईकडेही दुर्लक्ष होत असलेले दिसत आहे. सामान्य माणसाला किती त्रास सहन करावा लागत असेल, मग येथील अधिकारी आणि कर्मचारी करतात तरी काय ? असा सवाल करीत महापालिका आयुक्त नवलकिशोर राम यांनी संबंधित पालिका अधिकाऱ्यांना धारेवर धरले. अशा कामचुकार अधिकाऱ्यांची गय न करता घरी बसविणार असल्याचा इशारा त्यांनी दिला.

भाजपाचे जिल्हा उपाध्यक्ष व शेवाळेवाडीचे माजी उपसरपंच राहुल शेवाळे यांनी तीन दिवसांपूर्वी नव्याने समाविष्ट शेवाळेवाडी, मांजरी बुद्रुक तसेच साडेसतरानळी व केशवनगर परिसरातील समस्यांबाबत आयुक्त राम यांची भेट घेऊन निवेदन दिले होते त्यावेळी आयुक्तांनी दोन दिवसात या गावांना प्रत्यक्ष भेट देऊन पाहणी करणार असल्याचे सांगितले होते. त्यानुसार आज त्यांनी विविध अधिकाऱ्यांसह शेवाळेवाडी व मांजरी गावातील समस्यांची पाहणी केली. त्यावेळी त्यांनी हा इशारा दिला.

कचरा, ड्रेनेज, अरुंद रस्ते, त्यावरील खड्डे, अतिक्रमणे, पाणीपुरवठा, शाळांचा परिसर, त्यांना मिळवणाऱ्या सुविधा, अस्वच्छता, पथदिव्यांचा अभाव, सोलापूर महामार्गावरील धोकादायक ड्रेनेज असे एक ना अनेक प्रश्न त्यांना यावेळी जाणवले. पालिका हद्दीत इतक्या समस्या कशा असू शकतात, असा प्रश्न त्यांनी उपस्थित अधिकाऱ्यांना केला. शेवाळेवाडी व मांजरी परिसरातून उघड्यावरून वाहणाऱ्या सांडपाणी वाहिन्या, सोलापूर महामार्गावरील धोकादायक ड्रेनेज, कवडीपाट टोलनाका भापकरमळा रस्ता, मांजरी बुद्रुक येथील शाळा परिसर, मांजरी गावठाण ते मगर महाविद्यालय रस्ता, रेल्वे उड्डाणपूल आदी ठिकाणी त्यांनी प्रत्यक्ष उभे राहून समस्या जाणून घेतल्या. दरम्यान, अजित घुले व अमर घुले यांनी मांजरी बुद्रुक येथील समस्या सोडविण्यासाठी अधिकचा निधी देण्याची मागणी केली.

महापालिकेचे उपायुक्त अरविंद माळी, प्रसाद काटकर, संदीप कदम, मुख्य अभियंता अनिरुद्ध पावसकर, जगदीश खानोरे, नंदकुमार जगताप, अधीक्षक अभियंता आशिष जाधव, हडपसरचे सहाय्यक आयुक्त बाळासाहेब ढवळे पाटील, कार्यकारी अभियंता वीरेंद्र केळकर, राजेश शिंदे, उपअभियंता गणेश पुरम, राकेश शिंदे, सुनील पाटील, प्रवीण येळे, विभागीय अतिक्रमण निरीक्षक गणेश तारू, राकेश काची, आकाश ढेंगे, निखिल मोरे, शाहिद पठाण, अनंत ठोक आदी अधिकारी यावेळी उपस्थित होते. शेवाळवाडी मधील ओढ्यात बांधकाम व्यवसायिकांनी सांडपाणी सोडल्याने ग्रामस्थांच्या आरोग्याला धोका निर्माण झाला असल्याचे माजी सरपंच प्रतिमा व राहुल शेवाळे यांनी निदर्शनास आणून दिले. याशिवाय शेवाळवाडी चौकात पावसाळी वाहिन्यांमध्ये ड्रेनेज सोडल्याने समस्या गंभीर बनली आहे. मांजरी ग्रामपंचायत मध्ये रस्त्यांवर जागोजागी खड्डे पडले तसेच, रेल्वे उड्डाणपुलाचा रस्ता अरुंद असल्याने वारंवार अपघात होतात, महापालिकेने तातडीने त्याबाबत कार्यवाही करावी, अशी मागणी त्यांनी केली. ग्रामस्थ सुनील शेवाळे, विजय कोद्रे, संजय कोद्रे, मंगेश शेवाळे, बाळकृष्ण शेवाळे, अक्षय शेवाळे, चंद्रकांत शेवाळे, सिद्धार्थ शेवाळे, सुरेश शेवाळे आदी यावेळी उपस्थित होते.

## भिंतीच्या ढिगाऱ्याखाली दबून दोन महिला कामगारांचा मृत्यू, एक गंभीर




**दौंड । प्रतिनिधी**

दौंड तालुक्यातील कुरकुंभ एमआयडीसीतील मेलझर केमिकल प्रा. लि. कंपनीत बांधकाम सुरू असताना एक दुर्दैवी घटना घडली आहे. यात सुरक्षा भिंत कोसळून (-ललळवशपीं छश्ुी) दोन महिला कामगारांचा मृत्यू झाला असून एक महिला जखमी झाली आहे. ही घटना १६ ऑक्टोबर रोजी दुपारी साडेचारच्या सुमारास घडली. जयकुमार रामचंद्र मुंडफणे आणि अक्षय भानुदास मोरे असे गुन्हा दाखल असल्यांची नावे आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, ममतादेवी सुदाम दास वय २७ वर्षे, सोनीदेवी सरयु कुमार वय २८ वर्षे, अशी मृत महिला कामगारांची नावे असून त्या दोघी ही सध्या दौंड तालुक्यातील मुकादमवाडी पांढरेवाडी येथे राहत होत्या. त्या मुळच्या मध्य प्रदेशातील आहेत. तर गितादेवी बाबुलाल कोल या महिला कामगार जखमी असून तिच्यावर पिरॅमिड हॉस्पिटल दौंड येथे उपचार सुरू आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, संजय धनीराम नगरे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून दौंड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आलाय. भिंतीचे बांधकाम ओले असतानाच बाहेरील बाजूने जेसीबीने माती भरल्याने मातीचा भरावामुळे दबाव वाढल्याने भिंत आतील बाजूस कोसळली. कोसळलेल्या भिंतीच्या ढिगाऱ्याखाली वरील ३ महिला अडकल्या होत्या. तिथे उपस्थित असणारे नागरीकांच्या यांच्या मदतीने भिंतीच्या ढिगाऱ्याखालून महिलांना बाहेर काढून उपचारासाठी दौंड येथील खासगी रुग्णालयात दाखल केले. मात्र, उपचारापूर्वी दोन महिला मृत्युमुखी पडल्या होत्या. एक महिला गंभीर जखमी असून तिच्यावर उपचार सुरू आहेत.

## अटक करण्याच्या प्रयत्नात अमली पदार्थ तस्कराचा मृत्यू

**पुणे । प्रतिनिधी**

अमली पदार्थ तस्कारी प्रकरणात फरार असलेल्या एका सराईत गुन्हेगाराला मीरा भाईंदर पोलिस अटक करत असताना त्याचा मृत्यू झाला. प्राथमिक माहितीनुसार रक्तदाब वाढल्याने त्याचा मृत्यू झाला असल्याचे सांगण्यात येते. मात्र शवविच्छेदन अहवाल हाती आल्यानंतर त्याच्या मृत्यूचे नेमके कारण स्पष्ट होईल असे पोलिसांनी सांगितले. ही घटना कोंढवा येथे घडली. याप्रकरणी कोंढवा पोलीस ठाण्यात नोंद करण्यात आली आहे. अझीम अबू सालेम उर्फ अझीम खान (५१, रा.मीरा -भाईंदर) असे मृत्यू झालेल्या गुन्हेगाराचे नाव आहे. याप्रकरणी, कोंढवा पोलिस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

अझिम याच्यावर अंमली पदार्थ विक्री प्रकरणी अनेक गुन्हे दाखल आहेत. त्यालील काशीगाव पोलिस ठाण्यात दाखल असलेल्या एका मेफेड्रोन प्रकरणात मीरा-भाईंदर पोलिस त्याचा शोध घेत होते. त्याचा शोध घेण्यासाठी पोलिसांनी रत्नागिरी, कोल्हापूरमार्गे पुण्यात धाव घेतली होती. तीन दिवसांपूर्वीच अझम खान कोल्हापूरहून पुण्यात येऊन कौसरबागमधील एका तिसऱ्या मजल्यावरील सदनिकेमध्ये रहात असल्याची तांत्रिक माहिती मिळाली त्यांनी सायंकाळी साडेसातच्या सुमारास कोंढवा पोलिसांशी संपर्क साधून मदत मागितली.

पोलिस घटनास्थळी गेल्यावर सदनिकेचे दार आतून बंद होते. पोलिसांनी बराच वेळ दार ठोठावले, पण प्रतिसाद न मिळाल्याने त्यांनी दरवाजा तोडून आत प्रवेश केला. त्या वेळी खान पोलिसांवर झेपावला आणि एका कॉन्स्टेबलच्या छातीत चावा घेतला. त्यावेळी पोलिसांनी त्याला दूर ढकलले. यावेळी झालेल्या गोंधळात खान अचानक बेशुद्ध पडला आणि जमिनीवर कोसळला. कोंढवा पोलिस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक कुमार घाडगे यांनी सांगितले की, त्याला तातडीने ससून रुग्णालयात दाखल करण्यात आले. तेथे मृत घोषीत केले गेले. ही सदनिका त्याच्या मैत्रिणीची असल्याचे प्राथमिक तपासात समजत आहे. शवविच्छेदन अहवाल प्राप्त झाल्यानंतरच त्याच्या मृत्यूचे कारण समजेल असे देखील घाडगे यांनी सांगितले.

## वाल्ह्यातील रस्त्यावर बिबट्याचे दर्शन

**पुणे । प्रतिनिधी**

दातेवाडी (ता. पुरंदर) येथे शुक्रवारी (ता. १७) रात्री उशिरा एक दुचाकीस्वार घरी परतत असताना त्याला अचानक रस्ता ओलांडताना बिबट्या व त्याच्या दोन बछड्यांचे दर्शन झाले. त्यामुळे परिसरात भीतीचे वातावरण पसरले आहे. याबाबत वनविभागाला माहिती देण्यात आली आहे. वनविभागाकडून नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

वागदरवाडी (ता.पुरंदर) येथील आचारी व्यावसायिक दत्तात्रेय पवार हे शुक्रवारी रात्री नेहमीप्रमाणे आपल्या दुचाकीवरून घरी परतत होते. सुमारे सव्वानऊच्या सुमारास दातेवाडी येथे पोहोचताच त्यांना रस्त्यावर अचानक एक बिबट्या आणि त्यामागे दोन बछडे जाताना दिसली. त्यांनी धैर्य आणि शिताफीने गाडी पुढे नेली व सुरक्षित अंतरावर गेल्यावर त्यांनी तातडीने परिसरातील नागरिकांना याची माहिती दिली. त्यांनी परिसरातील ग्रामस्थांना याबाबत सावध करत सतर्क राहण्याचे आवाहन केले. त्यानंतर सामाजिक कार्यकर्ते कांतिलाल भुजबळ यांच्या माध्यमातून ही माहिती तत्काळ वनविभागाच्या कर्मचाऱ्यांपर्यंत पोहोचवण्यात आली. या घटनेनंतर संपूर्ण परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले. रात्री बाहेर न पडण्याचा सल्ला दिला जात आहे. गावातील काही भाग डोंगरालगत असून, सध्या बिबट्याच्या वावराचे प्रमाण वाढल्याचे स्थानिकांचे म्हणणे आहे

## डंपरला धडकून कारला आग; चालक किरकोळ जखमी



**पुणे । प्रतिनिधी**

ओव्हरटेक करण्याच्या प्रयत्नात भरधाव कारची डंपरला धडक बसली. या अपघाताने कारने समोरून पेट घेतला. सुदैवाने यामध्ये कोणती जीवितहानी झाली नाही. यात कारचालक किरकोळ जखमी झाला. तर कारचे मोठे नुकसान झाले. भुकूम (ता. मुळशी) येथे पुणे-कोलाड-दिघी पोर्ट महामार्गावर हा अपघात घडला. कार्तकि जयेश हाडके (वय २१, रा. लोणी काळभोर, ता. हवेली) असे या अपघातात जखमी झालेल्या कारचालकाचे नाव आहे.

कार्तकि हाडके या त्याच्या ताब्यातील कारमधून (एमएच १२ एक्सएक्स २०५८) मित्रांसमवेत पिरंगुटच्या दिशेने जात होता. तर पिरंगुटहून पुण्याच्या दिशेने जाणाऱ्या डंपरला (एमएच १२ एक्सएम १२५१) हाडकेच्या कारची जोरदार धडक बसली. त्यामुळे कारच्या समोरील भागाचा चुराडा झाला आणि इंजिनला आग लागली. सुदैवाने हाडकेसह मित्र कारमधून वेळीच बाहेर पडले. या वेळी त्या ठकाणी अग्निशमन केंद्राचा बंब उपलब्ध झाला. १० ते १५ मिनिटांच्या अंतराने कारला लागलेली आग आटोक्यात आणली. दरम्यान पुणे महानगरपालिकेचा बंब देखील पोहचला. हाडके हा कार ओव्हरटेक करत होता, या वेळी कारचा वेग खूप होता, असे प्रत्यक्षदर्शींनी सांगितले. डंपर चालकाने डंपरवरील नियंत्रण ठेवल्याने मोठी जीवितहानी टळली. माजी उपसरपंच सचिन बाळासाहेब हगवणे, अंकुश प्रकाश खाटपे, मयूर विजय हगवणे, मंगेश हगवणे, सागर रमेश माझीरे तसेच ग्रामस्थांनी मदतकार्य करत अपघातानंतर वाहतूक सुरळीत केली. या ठिकाणी यापूर्वी सुद्धा खूप मोठे अपघात झालेले आहेत. या परिसरामध्ये मोठ्या प्रमाणात महामार्गाच्या कडेला अतिक्रमण तसेच नागरिकांची वर्दळ असते. या ठिकाणी गतीरोधक टाकण्याची मागणी ग्रामस्थांनी केलेली आहे. याकडे महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने लक्ष द्यावे; अन्यथा महामंडळाच्या कार्यालयावर मोर्चा काढणार असल्याचा इशारा स्थानिकांनी दिला.

## विश्वकर्मा विद्यापीठ व व्हीआयटीत 'एआय-चालित अर्थव्यवस्थेत उद्देशाधारित शिक्षण' या विषयावर व्याख्यान



**पुणे । प्रतिनिधी**

विश्वकर्मा विद्यापीठ (तण) आणि विश्वकर्मा इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी (तखढ), पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने आणि कोर्सेरा यांच्या सहकार्याने झ्ीीिशि-ऊीर्ळींशप ङशरीपळपसः ढहश कीरप ऋीपवरींळेप षेी ऋीीोळीहळपस ळप रप -ख-झेुशीशव एलेपेू या विषयावर प्रेरणादायी व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. या सत्राचे प्रमुख वक्ते अमेरिकेतील मिशिगन विद्यापीठाच्या सार्वजनिक आरोग्य शाळेतील प्रसिद्ध वर्तणूक वैज्ञानिक डॉ. व्हिक्टर स्ट्रेचर होते.

या व्याख्यानात एआय-चालित (-I-powered) अर्थव्यवस्थेत मानवी उद्देशाची भूमिका, मानसिक आरोग्याचे महत्त्व आणि तांत्रिक प्रगतीशी माणूस कसा प्रभावीपणे जुळवून घेऊ शकतो यावर सखोल चर्चा झाली. डॉ. स्ट्रेचर यांनी आपल्या भाषणात स्पष्ट केले की, कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे मोठ्या प्रमाणावर नोकऱ्या नष्ट होणार नाहीत, उलट ती मानवाला नव्या संधी आणि नवोन्मेषासाठी मार्ग दाखवेल. तंत्रज्ञान हे बदल घडविणारे साधन आहे, आणि त्याचा सकारात्मक वापर केल्यास समाज अधिक प्रगत होऊ शकतो. त्यांनी पुढे सांगितले की, एआयच्या युगात टिकून राहण्यासाठी आणि प्रगती करण्यासाठी उद्देशभावना (sense of purpose) हीच खरी किल्ली आहे. आपल्या मूल्ये आणि ध्येय स्पष्ट असलेले लोक बदलत्या तांत्रिक वातावरणाशी अधिक चांगल्या प्रकारे जुळवून घेतात आणि एआयचा उपयोग स्वतःच्या प्रगतीसाठी करू शकतात.

मानसिक आरोग्याच्या संदर्भात डॉ. स्ट्रेचर यांनी सांगितले की, चिंता आणि नैराश्यामुळे कार्यक्षमतेवर नकारात्मक परिणाम होतो, तर उद्देशाधारित दृष्टिकोन मानसिक स्थैर्य आणि कार्यक्षमता वाढवतो. तसेच त्यांनी संशोधन आणि शिक्षण क्षेत्रात एआयच्या उपयुक्ततेवर प्रकाश टाकत म्हटले की, कृत्रिम बुद्धिमत्ता शिक्षण अनुभव वैयक्तिकृत करू शकते, सर्जनशीलता वाढवू शकते, तसेच जागतिक गुंतागुंतीच्या समस्यांच्या निराकरणासाठी हातभार लावू शकते. या कार्यक्रमाला प्राध्यापक, संशोधक आणि विविध क्षेत्रातील व्यावसायिक यांची उत्स्फूर्त उपस्थिती लाभली. उपस्थितांनी एआय-सक्षम संधी आणि उद्देशाधारित शिक्षण यांचा संगम साधण्यासाठी व्यावहारिक उपायांवर विचारमंथन केले.

## 'मकोका' कारवाईनंतर पसार आरोपीला अखेर अटक; बंडू आंदेकर टोळीतील गुंड गजाआड

**पुणे । प्रतिनिधी**

माजी नगरसेवक वनराज आंदेकरच्या खुनाचा बदला घेण्यासाठी प्रतिस्पर्धी टोळीतील सराइतांच्या नातेवाईकांच्या घरावर पाळत ठेवणाऱ्या आंदेकर टोळीतील एकाला भारती विद्यापीठ पोलिसांनी अटक केली. दत्ता बाळू काळे (वय २४, रा. डोके तालमीजवळ, नाना पेठ) असे अटक करण्यात आलेल्याचे नाव आहे. आंदेकर टोळीतील सराइताविरुद्ध महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायद्यान्वये (मकोका) कारवाई केल्यानंतर तो पसार झाला होता.

१ सप्टेंबर २०२४ रोजी माजी नगरसेवक वनराज आंदेकर याचा खुनाचा बदला घेण्यासाठी प्रतिस्पर्धी टोळीतील सोमनाथ गायकवाड आणि साथीदारांच्या घराच्या परिसरात आंदेकर टोळीतील दत्ता काळेने पाळत ठेवली होती. प्रतिस्पर्धी टोळीतील सराइत आणि त्यांच्या नातेवाईकांच्या खुनाचा कट आंदेकर टोळीने रचला होता. पोलिसांना याबाबतची माहिती मिळाल्यानंतर आंदेकर टोळीतील सराइतांना अटक करण्यात आली होती. याप्रकरणात कृष्णा आंदेकर याच्यासह गुन्हा दाखल झाल्यानंतर काळे पसार झाला होता. भारती विद्यापीठ पोलिसांचे पथक त्याचा शोध घेत होते.

काळे लक्ष्मीनारायण चित्रपटगृहाच्या परिसरातील उड्डाणपुलाजवळ थांबला होता. याबाबतची माहिती पोलिस कर्मचारी महेश



बारावकर, मंगेश पवार यांना मिळाली. त्यानंतर सापळा लावून काळेला पकडले. परिमंडळ दोनचे पोलिस उपायुक्त मिलिंद मोहिते, सहायक आयुक्त राहुल आवारे यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलिस निरीक्षक राहल खिलारे, उपनिरीक्षक नीलेश मोकाशी, महेश बारावकर, मंगेश पवार, नीलेश खैरमोडे, मंगेश गायकवाड, किरण साबळे, तुकाराम सुतार, संदीप आगळे, मितेश चोरमोले, अभिनय चौधरी यांनी ही कारवाई केली दरम्यान, वनराज आंदेकर याच्या खुनाचा बदला घेण्यासाठी गणेश कोमकर याचा मुलगा आयुष कोमकर याच्यावर पिस्तुलातून गोळीबार करून खून करण्यात आल्याची घटना ५ सप्टेंबर रोजी घडली होती. आयुष हा बंडू आंदेकरचा नातू आहे. वनराज आंदेकर खून प्रकरणात गणेश कोमकरला अटक करण्यात आली होती. आयुष याच्यावर अमन पठाण आणि यश पाटील यांनी गोळीबार केला होता. आयुष कोमकर खून प्रकरणात या प्रकरणात सूर्यकांत उर्फ बंडू राणोजी आंदेकर (वय ७०) याच्यास साथीदारांना अटक करण्यात आली. आंदेकरसह साथीदारांविरुद्ध 'मकोका' करवाई करण्यात आली होती. आंदेकर टोळीविरुद्ध खंडणी, बेकायदा फलक लावल्याप्रकरणी गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. जमीन व्यवहारात फसवणूक केल्या प्रकरणी बंडू आंदेकरसह बांधकाम व्यावसायिकांविरुद्ध उत्तमनगर पोलिसांनी नुकताच गुन्हा दाखल केला.

## नकारात्मक बोलू नका, जनसेवक म्हणून काम करा ; दिलीप वळसे पाटलांचा कार्यकर्त्यांना कानमंत्र



**रांजणगाव । प्रतिनिधी**

केंद्र आणि राज्य दोन्हीही सरकारे एकाच विचारधारेची असल्याने जिल्हा परिषद व पंचायत समिती पदाधिकारी निधी आणण्याचे काम अधिक प्रामाणिकपणे करतील. कार्यकर्त्यांनी नकारात्मक बोलणे बंद करून जनतेचे सेवक म्हणून काम करावे. असे प्रतिपादन माजी गृहमंत्री दिलीप वळसे पाटील यांनी केले.स्वतःची उमेदवारी स्वतः जाहीर करू नका, सर्वांनी पक्षशक्ती वाढविण्यासाठी कामाला लागा. जिल्हा परिषदेत राष्ट्रवादीचा झेंडा फडकवायचा आहे. असा त्यांनी निर्धार करून पदाधिकारी, कार्यकर्त्यांना दिलीप वळसे पाटील यांनी भाषणातून कान टोचले आहे.

शिरूर तालुक्यातील कवठे येमाई येथे राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचा कार्यकर्ता मेळावा आयोजित करण्यात आला होता. त्यावेळी ते बोलत होते.यावेळी म्हाडाचे अध्यक्ष, माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील, माजी आमदार पोपटराव गावडे आणि उपस्थित . या वेळी मंचावर प्रदीप वळसे पाटील, शिरूर-आंबेगाव विधानसभा अध्यक्ष मानसिंग पाचुंदकर, राजेंद्र गावडे, प्रकाश पवार, सुभाष उमाप, सविता पऱ्हाड, बालाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष सदाशिव पवार, कात्रज दूध संघाचे अध्यक्ष ड. स्वप्नील ढमढेरे, मनीषा गावडे, विश्वास कोहोकडे, सविता बगाटे, कात्रज दूध संघाच्या माजी अध्यक्षा केशरताई पवार, सुभाष उमाप, आबासाहेब पाचुंदकर शिवाजीराव ढोबळे, सविता प्रमोद पऱ्हाड, शिवाजीराव ढोबळे, स्वप्नील ढमढेरे, मनीषा गावडे, राजेंद्र नरवडे, लहू थोरात, सुजाता नरवडे, निर्मला नवले, अजित कोहोकडे, विश्वास कोहोकडे, नंदकुमार पिंगळे, अमोल जगताप , माणिक खेडकर, सुदाम इचके, वासुदेव जोरी आदी मान्यवर उपस्थित होते.शिवाजीराव आढळराव पाटील यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, निष्ठावंत व प्रामाणिक कार्यकर्त्यांना उमेदवारी द्या. स्थानिक गाव पातळीवरील गट- तट पक्षाला हानी पोहोचवतात, त्यामुळे कार्यकर्त्यांनी एकजुटीने काम करावे. मानसिंग पाचुंदकर म्हणाले की, लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीत निष्ठेबद्दल बोलणाऱ्यांची निष्ठा आता कुठे गेली, याचा आत्मचिंतन सर्वांनी करावे. प्रास्ताविक शुभांगी पडवळ यांनी केले. सूत्रसंचालन निलेश पडवळ यांनी केले तर दीपक रत्नपारखी यांनी आभार मानले.

## योग म्हणजे मन, शरीर व चित्त जोडणारा राजयोग - मोहन भागवत

**लोणावळा । प्रतिनिधी**

सर्वांशी जोडून राहण्याचा राजयोग मार्ग म्हणजे योग आहे. आपल्या पूर्वजांनी योग आत्मसात केला. योगामुळे चित्त, मन व शरीर हे शांत व एक संध राहत आहे. ज्याची जशी बुध्दी आहे तो त्या पद्धतीने वागत असतो. मात्र, योगाला आत्मसात केल्यानंतर शरीर व मनाला तसेच विचाराला एक संध राखता येऊ शकते, असे प्रतिपादन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे संघचालक मोहन भागवत यांनी केले.




कैवल्यधाम योग संस्थेचा १०१ वा स्थापना दिवस सरसंघचालक मोहन भागवत व परमपूज्य आचार्य महामंडलेश्वर श्री स्वामी विश्वेश्वरानंद गिरीजी महाराज यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये लोणावळा शहरामध्ये साजरा करण्यात आला. कार्यक्रमात माजी मंत्री सुरेश प्रभू, कैवल्यधाम योग संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी सुबोध तिवारी, अनुसंधान अधिकारी डॉ. रणजीत सिंग भोगल आदी उपस्थित होते. शांतीपाठ व दीप प्रज्वलनाने या कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.

या वेळी बोलताना सरसंघचालक मोहन भागवत म्हणाले, की कैवल्यधाम योग संस्था व राष्ट्रीय स्वयंसेवक संघ या दोन्ही संस्था समाजाला एकसंघ करण्याचे काम करत आहेत. दोन्ही संस्था वेगवेगळ्या असल्या तरी त्यांचा उद्देश हा एकच आहे. भारत हा अतिप्राचीन देश आहे व योग ही त्या प्राचीनतेची ओळख आहे. भारताला विश्वगुरू बनवण्याचे कार्य या दोन्ही संस्था करत आहेत. योग करणारी व्यक्ती ही संघ शाखेला आत्मसात करते. तर, संघ शाखेमध्ये आलेले योगाला आत्मसात करत आहेत. योग व विज्ञान यामध्ये फरक असण्याचे कारण नाही, या दोन्ही गोष्टी अनुभवणे गरजेचे आहे. योगामुळे विचार संतुलित राहतात व त्यामुळेच सुदृढ समाज घडत आहे, असे मोहन भागवत यांनी सांगितले.

डॉ. सुरेश प्रभू यांनी कैवल्यधाम योग संस्थेच्या शताब्दी वर्षाचा लेखाजोखा उपस्थितांसमोर मांडला. स्वामी महामंडलेश्वर विश्वेश्वरानंद महाराज म्हणाले, की शंभर वर्षांपूर्वी स्वामी कुवलयानंद यांनी योगाला जपण्याचे काम केले. पुढे ओ. पी. तिवारी व सुबोध तिवारी यांनी ही संस्था सांभाळली व वाढवली. नाव हे क्षणिक असते मात्र संस्था कायम असणार आहेत व मानवसेवा करत राहणार. चांगले झाड हवे असेल तर बीज चांगले असायला हवे. आरएसएस व कैवल्य धाम या दोन्ही संस्था मानवता व राष्ट्रासाठी काम करत आहेत. सत्ता, संपत्ती, नाव क्षणिक आहे, मात्र योगामुळे शरीर, मन व चित्त स्वस्त राहते, असे त्यांनी सांगितले.

मोहन भागवत यांनी कैवल्यधाम संस्थेच्या सांदीपनी ग्रंथालय, शास्त्रीय अनुसंधान विभाग, परमपूज्य स्वामी कुवलयानंदजी यांचे समाधीस्थळ आणि गोशाळा येथे भेटी दिल्या. तसेच, कैवल्यधाम ऐतिहासिक संग्रहालय, कैवल्य विद्या निकेतन शाळा, गोवर्धनदास सेक्सरिया योग महाविद्यालय आणि वैज्ञानिक प्रकल्प याबद्दल संक्षिप्त स्वरूपात माहिती जाणून घेतली. कार्यक्रमादरम्यान डॉ. रितु प्रसाद लिखित सात्विक आहार आणि डॉ. शरदचंद्र भालेकर लिखित योगमय पोलिस या पुस्तकाच्या हिंदी आवृतीचे प्रकाशन करण्यात आले. तसेच. कार्यक्रम समाप्तीनंतर मोहन भागवत यांनी स्थानिक राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या स्वयंसेवकांना संबोधित केले. सूत्रसंचालन गोवर्धनदास सक्सेरिया योग महाविद्यातील विद्यार्थिनी शनया वात्सायन यांनी केले.